मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

'समसमां संयोग कीं जाहला'



१. श्रीमंत बाबूराव देशमुख, २. सवाई गंधर्व, ३. (उभे) श्री. भीमसेन जोशी, ४. श्री. मधुकर देशमुख.

* डॉ. मा. गो. देशमुख. * डॉ. य. खु. देशपांडे. * ना. रा. शेंडे. * मधुकर मंगरूळकर.
* मनोहर म. देशपांडे. * डॉ. शं. दा. पेंडसे. * प्रा. म. के. शेटे. * दुर्गा भागवत.

वाणी विलास, मध्यप्रदेश संशोधन व साहित्य वार्ता, विदर्भ साहित्य संघवार्ता इत्यादि.

वर्ष ५ वें
अंक ४ था.

संपादक
वामन कृष्ण चोरघडे.

एप्रिल १९५०
किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मध्यप्रांत व वऱ्हाड शाळाखात्याकडून लायब्ररींसाठीं मंजुरी मिळालेलें

वर्ष पांचवें]

युगवाणी

एप्रिल १९५०

[अंक चवथा

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना फक्त रु. तीन

संपादकीय—

आपणा भारतवासीयांचें नवें वर्ष या गुढीपाडव्याला सुरू होतें. नऊ दिवसांत सगळी नक्षत्रें आपापलीं लक्षणें दाखवून जातात आणि अनुभवी शेतकरी पुढील पावसाचा या नक्षत्रांवरून अंदाज घेत असतात. नव्या वर्षाबद्दल वाचकांना सुखद भविष्यकालाची शुभेच्छा मी या अंकाबरोबर सादर करीत आहें.

याच अंकांत दोन महामानवांचें स्मरण करावयाचें आहे. एक—मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र आणि दुसरे संतश्रेष्ठ तुकाराम बुवा. प्रभु रामचंद्राचें सबंध चरित्र हें मानवाला आपल्या कर्तबगारी, संयम, तप, आणि प्रमाणबद्धता यांच्या जोरावर प्रभूपद कसें मिळतें याची शिकवण देतें. रामचंद्राच्या चरित्राचें सारसर्वस्व म्हणजे कर्तव्य, कठोर कर्तव्य, तप, उग्रतप, आणि मर्यादा, पराकोटीची मर्यादा हें होय. रामालाहि आपल्या सारखेच सुखदुःखाचे उमाळे होते.

पत्नीसाठी राम रडला, पण तो विजनांत जाऊन अगदी मनोभन प्रजेची क्षमा मागून. कारण त्यांतहि लोकाराधनेची मर्यादा त्याला संभाळवयाची होती. राम जगला तोहि कर्तव्यासाठीच. सीतेचा त्याग करावा लागल्यामुळे हृदयाचे तुकडे झाले आणि ‘ न च रामो न जीवति ’ असा उद्गार रामाने काढला व राम जीवंत राहिला तोहि या कर्तव्याच्या बळावरच. रामाला सुख लाभलें नाही, दीपज्योतीला जळण्यांत जर सुख असेल तर तें मात्र रामाला लाभलें आहे. आपल्या स्नेह, दया, सुख व जानकी म्हणजे सर्वस्वाचा त्याग करावयाचा आणि प्रजेला प्रकाश द्यावयाचा हें व्रत म्हणजे रामाचें जीवन. उभ्या आयुष्यभर त्यागच त्याग, दुःखच दुःख. पण नवें आदर्श ज्यांना अमलांत आणावयाचे असतात, नवीं तत्त्वें ज्यांना उजळावयाचीं असतात आणि ज्यांच्यावर जनतेच्या मार्गदर्शनाची जबाबदारी येऊन पडते त्यांना रामासारखेंच वागावें लागतें आणि त्याच्याच आदर्शाप्रमाणे चालावें लागतें. आजच्या या लोकशाहीच्या काळांत सर्वत्र अंधारून आलें असतांना या पतीतपावन मर्यादापुरुषोत्तमाचें स्मरण अवश्य व समयोचित होय.

संतश्रेष्ठ तुकारामबोवांना वैकुंठाला जाऊन तीनशे वर्षें झालीं. त्याबद्दलचा उत्सव ठिकठिकाणीं साजरा केला जात आहे. तुकयाची वाणी अभंग राहिली आणि ती जनतेने आपल्या हृदयांत कोरून ठेवून आपल्या सुखदुःखाच्या वेळीं वापरली. मराठी जनतेच्या थेट हृदयापर्यंत जर कुणा एकमेव विभूतीचा प्रवेश झाला असेल तर तो जनतेच्या या लाडक्या तुकोबारायांचाच. त्यांनी जें जें सांगितलें तें अनुभवाने, तळमळीने आणि तावून सुलाखून पक्क्या झालेल्या जाणीवेने. त्यांच्या वाणीचा प्रवाह गंगेसारखा निर्मळ आणि गंगोत्रीसारखा जीवंत आहे. या गंगोत्रीने आजवर हजारो लाखो तृषार्तांची तहान भागविली आहे. तुकोबारायांची वाणी अमोघ, अखंड, अमर आहे. तिच्या एखाद-दुसऱ्या बिंदूने मानवी जीवनांत औषधाचें काम केलें आहे. अशा या संतश्रेष्ठाला शत सहस्र प्रणाम !

आपले ज्ञाननिधि कै. डॉ. श्री. व्यं. केतकर यांचीहि श्राद्धतिथि एप्रिल मध्येंच येत आहे. त्यांच्या स्मृतीने नव्या जोमाच्या मराठी मंडळींना सतत, चिकाटीने कार्य करण्याची चेतना मिळणार आहे. त्यांच्या जीवनांतील कोमल छटावर प्रकाश टाकणारा कु. दुर्गाबाई भागवत यांचा लेख या अंकी याच उद्देशाने दिला आहे.

ता. ३१-३-५०.

वामन कृष्ण चोरघडे.

र स व्य व स्था

डॉ. मा. गो. दे श मु ख

☆

चांदा येथे फेब्रुवारीच्या ता. ४, ५ ला भरलेलें विदर्भ साहित्य संमेलन गाजलें. त्याच्या अध्यक्षपदावरून डॉ. मा. गो. देशमुख यांनी केलेल्या भाषणांतील कांही भाग वाङ्मयचर्चेच्या दृष्टीने फार महत्त्वाचा होता. आपल्या भाषणांत त्यांनी रससिद्धांताचें उच्चाटन करावें असें प्रतिपादन करून त्या ऐवजी 'भावगन्ध' ही संज्ञा सुचविली. रससिद्धांताच्या अपुरेपणाविषयी यापूर्वी अनेकांनी नापसंती व्यक्त केलेली आहे. पण विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासारख्या एखाद्या उच्च स्थानावरून रस व्यवस्थेचें उच्चाटन करावें असें प्रतिपादन हें प्रथमच होत आहे. डॉ. देशमुखांनी सुचविलेल्या 'भाव गंध' या संज्ञेविषयी आतां मराठींतील साहित्यिकांकडून व टीकाकारांकडून जें मतप्रदर्शन होईल तें मराठी साहित्याला व साहित्यशास्त्राला निःसंशय उपकारक ठरेल असें वाटतें. डॉ. देशमुखांच्या अध्यक्षीय भाषणांतील 'भावगंधा'विषयीचा भाग संक्षेपाने पण शक्यतों त्यांच्याच शद्बांत पुढे दिला आहे :

साहित्यशास्त्राने साहित्याच्या संगतीने चालावें

अक्षरवाङ्मय म्हणजे केवळ अक्षरें किंवा शद्ब नव्हेत. शद्ब व अर्थ यांचें रमणीय साहचर्य दिसलें म्हणून आधुनिक काव्यमीमांसेंत 'शद्बार्थौ सहितं काव्यम्' अशी भामहाने 'साहित्याची' व्याख्या केली. पण नुसती शद्बार्थांचीच सुसंगति चालणार नाही. त्या साहित्यानेंहि जीवनाच्या संगतीने चाललें पाहिजे. साहित्य हें जीवन-समृद्धीचेंच नव्हे, तर खुद्द साहित्यशास्त्राचेंहि मूलभूत साधन आहे. साहित्यशास्त्र हें जोंवर साहित्याच्या संगतीने चालेल तोंवर तें विकसित होईल. नाही तर संस्कृत साहित्यशास्त्राप्रमाणे खंडित होईल. आजच्या जीवनाला साजेसें जसें साहित्य हवें, त्याचप्रमाणे साहित्याला साजेसें नवें शास्त्रहि पाहिजे.

भरतमुनीने नाट्यशास्त्रांत प्रतिपादिलेला रस पुढे ध्वनिसिद्धांताची मदत घेऊन पूर्ण झाला. पुढे रसाच्या संख्येविषयी थोडीफार कुरबूर झाली तरी रसाची चौकट मोडली नाही. संतकवींच्या पृथगात्म भक्तिकाव्यामुळे भक्तिरस मानणें अपरिहार्य झालें. तरीहि खुद्द रससिद्धांत मात्र त्यांनी—त्यांनीच काय, पण आधुनिक साहित्यशास्त्रांनीहि उडवून मात्र दिला नाही. नव्या पंडितांनी सर्वस्वी भिन्न व व्यापक प्रवृत्तींचें नवकाव्य जेव्हा या नवरसांच्या कसोटीला लावण्याचा प्रयत्न केला तेव्हा

ते फजीत झाले. तरीहि चिपळूणकरांनी 'उदात्त' महादेव मल्हार जोशी यांनी 'विनोद', अनिलांनी 'प्रक्षोभ' व जावडेकरांनी 'क्रांति' अशी विविध रसांची पुरती जोडण्याचाच फक्त प्रयत्न केला.

नवे उमाळे, नवें कवन

आज सर्वच रंग पालटला आहे. आपलीं जीवनमूल्यें बरींचशीं बदललीं आहेत. नवकवींनी आपल्या प्रेरणा अभिजात संस्कृत किंवा प्राचीन संतकाव्यापासून न घेतां पाश्चात्य साहित्यानुशीलनांतून व त्या समाजाच्या जीवनविषयक कल्पनांशी तन्मय होऊन घेतल्यामुळेच त्यांच्या कृतींना नवकाव्याचें रूप आलें आहे. जेथे जीवनमूल्येंच बदललीं, तेथील

नव्या उमेदी, नवे जिव्हाळे, नव्यामराठ्यांचे

नवे भरोसे, नवें कवन हें, नव्या उमाळ्याचें !

अशा नवकाव्याला जुने सिद्धांत लावतांना ते किती म्हणून ताणणार ? केशवसुतांच्या 'तुतारी'चें एखाद्या वीररसाच्या प्रकाराने बळेंच समर्थन कदाचित करतां येईल. पण वातचक्र, सतारीचे बोल, झपूर्झा, हरपलें श्रेय यांची बूज रसध्वनीने कधी सुकर होईल काय ?

नवकाव्याच्या सूक्ष्म भाषाविष्कारासाठी रसादि घनरूप ' दगडाचे चूर ' अपूर्ण पडणारच. शिवाय जुन्या साहित्यशास्त्रांतील बऱ्याचशा संज्ञा आतां वापरून शिथिल झाल्या आहेत. त्यांत नेमका अर्थ व्यक्त करण्याचें 'साहित्य' उरलें नाही. खुद्द 'रस' शब्दाची तीच अवस्था झाली आहे. व्याख्येंत रस हा काव्यगत मानायचा पण खरोखर तो रसिकाच्या मनांत उद्भवणार ! त्यामुळे रसचर्चेत मानसशास्त्र आलें. शास्त्राची काव्यचर्चेला कसोटी लावण्याचा डॉ. वाटवे इत्यादींचा प्रयत्न द. के. केळकर, लवंदे इत्यादींना अगम्य वाटला. कारण, कांही झालें तरी साहित्यशास्त्राने साहित्याच्या संगतीनें चाललें पाहिजे.

प्रस्तर झालेला ' रस '

नवे जुने काव्यमीमांसक रसाचेंच चर्वण करीत आहेत याचें कारण ' रस हा काव्याचा आत्मा ' हें भ्रामक गृहीत तत्त्व होय. या कल्पनेच्या जबरदस्त पगड्यामुळे हृद्य काव्य देखील 'अकाव्य' ठरतें. ही आपत्ती टाळण्यासाठी खुद्द 'रसा'ची अपूर्णता दाखवण्याऐवजी आम्ही एक तर रससंख्येंत नवी भर टाकतों, नाही तर त्याला तैत्तिरीय उपनिषदांतील ब्रह्मानंदाचा सहोदर बनवून गयावया करायला लावून नवप्रवृत्तींनाहि व्याकूळ करतों. साधारणांच्या आशाआकांक्षा, कडूगोड प्रसंग, ऐहिक आणि लौकिक सुखदुःखें, फार तर क्षणांत नाहीसे होणारे दिव्य भास हे ज्या नवकाव्यांत कल्पकतेने वर्णन केलेले असतात त्याला हा ' अलौकिक चमत्कारी ' रस पेलत नाही.

सृष्टिसौंदर्याचें वर्णन रसांत बसूं शकत नाही म्हणून जगन्नाथ पंडिताने काव्याच्या व्याख्येंत रसाचा उल्लेख गाळला. पण शेवटीं मुनिवचनापुढें मान तुकावलीच. डॉ. माधवराव पटवर्धनांनी 'रसव्यवस्थेचें वैयर्थ्य' जाणवूनहि तिच्यांतच नुसत्या सुधारणा सुचवल्या. यापुढें मात्र नवकाव्याला रसव्यवस्था अपर्याप्त आहे हें पटल्यावर ह्या पांघरुणाला ठिगळें जोडण्यांत अर्थ नाही आणि त्यांत कोंबण्यासाटीं नवप्रवृत्तींचे हातपाय तोडणेंहि शक्य होणार नाही. तेव्हां या प्रस्तर झालेल्या रसाला सूक्ष्म असें वायुरूप धारण करून येण्यासाठीं 'वातचक्रां'त भिरकावून दिला पाहिजे ! तो आडवा आला म्हणजे काव्यचर्चा त्यावर ठेंचाळणारच.

सर्व कलांचें मूलतत्त्व—भाव

प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्राने रसिकाकडे व त्याच्यामध्ये होणाऱ्या भावनाजागृतीकडे आपलें लक्ष विशेष पुरवलें. उलट पाश्चात्यांनी काव्याच्या निष्पत्तीवर, कवीवर आपलें लक्ष केंद्रित केलें. या दोन्ही दृष्टिकोनांना, 'कविस्तु सामाजिक तुल्य एव' या न्यायाने कवि व वाचक यांना समान असलेलें तत्त्व, संस्कृत साहित्यशास्त्र, आधुनिक साहित्यशास्त्र व सौंदर्यामीमांसा यांचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां सांपडतें. तें म्हणजे 'भाव'. केवळ काव्यच नव्हे तर ललितकलेच्या सर्व प्रकारांत अनुस्यूत असलेलें तत्त्व 'भाव' हेंच होय.

खुद्द भरताने 'न भावहीनोऽस्तिरसः न भावो रसवार्जितः' असें म्हणून 'भावा'ला रसाच्या बरोबरीचा दर्जा दिला. पण विश्वानाथानंतर रस इतका व्यापक झाला की त्याने 'भावा'ला आपल्यांत सामावून घेतलें. पाश्चात्य काव्यमीमांसेंतील काव्याच्या मुळाशी असलेलें तत्त्व जें feeling, emotion किंवा expression, त्याचा समावेश 'भाव' या शब्दांत होणार नाही काय? तसेंच पाश्चात्य सौंदर्यशास्त्राने सूक्ष्म विचारांतीं आतां सर्व ललितकलांचें मूलतत्त्व सौंदर्यसंवेदनक्षमता (aesthetic sensibility) किंवा सौंदर्यभाव (aesthetic emotion) हेंच निश्चित केलें आहे. या दृष्टीने 'भाव' (म्हणजेच सौंदर्यभाव) हें तत्त्व कसें कलामूलगामी आहे, तें दिसून येईल. काव्यानुभूतीच्या सर्व क्षत्रांत 'भावा'चें अस्तित्व दिसून येतें.

काव्याचें उपकरण–प्रतिमा

ललितकला व काव्य यांमधील भावतत्त्वाचें आकलन होण्यासाठी त्या त्या कलांचें माध्यम व उपकरणें पाहिलीं पाहिजेत. कोणत्या सृष्टमात्राचा बोध आपल्याला कोणत्या तरी ज्ञानेंद्रियद्वारांच होतो. कर्ण, त्वचा, नेत्र, जिव्हा व घ्राण हीं पंचेंद्रियें आणि अनुक्रमे शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे त्यांचे पांच विषय सुप्रसिद्ध आहेत. सृष्टमात्राचें इंद्रियगोचर अंग म्हणजे कलेचें माध्यम होय. ललितकलांपैकी संगीतांत शब्दाचें, चित्रकलेंत रूपरंगाचें, शिल्प व नृत्य या कलांत स्पर्श व रूप यांचीं व नाट्यकलेंत शब्द-स्पर्श-रूप यांचीं ज्ञानेंद्रियें वापरावीं लागतात. या सर्व कलांना विशिष्ट ज्ञानेंद्रियगत अनुभवाची आवश्यकता आहे. काव्यकलेचें

ते फजीत झाले. तरीहि चिपळूणकरांनी 'उदात्त' महादेव मल्हार जोशी यांनी 'विनोद', अनिलांनी 'प्रक्षोभ' व जावडेकरांनी 'क्रांति' अशी विविध रसांची पुस्ती जोडण्याचाच फक्त प्रयत्न केला.

नवे उमाळे, नवें कवन

आज सर्वच रंग पालटला आहे. आपलीं जीवनमूल्यें बरींचशीं बदललीं आहेत. नवकवींनी आपल्या प्रेरणा अभिजात संस्कृत किंवा प्राचीन संतकाव्यापासून न घेतां पाश्चात्य साहित्यानुशीलनांतून व त्या समाजाच्या जीवनविषयक कल्पनांशी तन्मय होऊन घेतल्यामुळेच त्यांच्या कृतींना नवकाव्याचें रूप आलें आहे. जेथे जीवनमूल्येंच बदललीं, तेथील

नव्या उमेदी, नवे जिव्हाळे, नव्यामराठ्यांचे

नवे भरोसे, नवें कवन हें, नव्या उमाळ्याचें !

अशा नवकाव्याला जुने सिद्धांत लावतांना ते किती म्हणून ताणणार ? केशवसुतांच्या 'तुतारी'चें एखाद्या वीररसाच्या प्रकाराने बळेंच समर्थन कदाचित करतां येईल. पण वातचक्र, सतारीचे बोल, झपूर्झा, हरपलें श्रेय यांची बूज रसध्वनीने कधी सुकर होईल काय ?

नवकाव्याच्या सूक्ष्म भावाविष्कारासाठी रसादि घनरूप 'दगडाचे चूर' अपूर्ण पडणारच. शिवाय जुन्या साहित्यशास्त्रांतील बऱ्याचशा संज्ञा आतां वापरून शिथिल झाल्या आहेत. त्यांत नेमका अर्थ व्यक्त करण्याचें 'साहित्य' उरलें नाही. खुद्द 'रस' शब्दाची तीच अवस्था झाली आहे. व्याख्येंत रस हा काव्यगत मानायचा पण खरोखर तो रसिकाच्या मनांत उद्भवणार ! त्यामुळे रसचर्चेंत मानसशास्त्र आलें. शास्त्राची काव्यचर्चेला कसोटी लावण्याचा डॉ. वाटवे इत्यादींचा प्रयत्न द. के. केळकर, लवंदे इत्यादींना अगम्य वाटला. कारण, कांही झालें तरी साहित्यशास्त्राने साहित्याच्या संगतीने चाललें पाहिजे.

प्रस्तर झालेला 'रस'

नवे जुने काव्यमीमांसक रसाचेंच चर्वण करीत आहेत याचें कारण 'रस हा काव्याचा आत्मा' हें भ्रामक गृहीत तत्त्व होय. या कल्पनेच्या जबरदस्त पगड्यामुळे हृद्य काव्य देखील 'अकाव्य' ठरतें. ही आपत्ती टाळण्यासाठी खुद्द 'रसा'ची अपूर्णता दाखवण्याऐवजी आम्ही एक तर रससंख्येंत नवी भर टाकतों, नाही तर त्याला तैत्तिरीय उपनिषदांतील ब्रह्मानंदाचा सहोदर बनवून गयावया करायला लावून नवप्रवृत्तींनाहि व्याकूळ करतों. साधारणांच्या आशाआकांक्षा, कडूगोड प्रसंग, ऐहिक आणि लौकिक सुखदुःखें, फार तर क्षणांत नाहीसे होणारे दिव्य भास हे ज्या नवकाव्यांत कल्पकतेने वर्णन केलेले असतात त्याला हा 'अलौकिक चमत्कारी' रस पेलत नाही.

सृष्टिसौंदर्याचें वर्णन रसांत बसूं शकत नाही म्हणून जगन्नाथ पंडिताने काव्याच्या व्याख्येंत रसाचा उल्लेख गाळला. पण शेवटीं मुनिवचनापुढे मान तुकावलीच. डॉ. माधवराव पटवर्धनांनी 'रसव्यवस्थेचें वैयर्थ्य' जाणवूनहि तिच्यांतच नुसत्या सुधारणा सुचवल्या. यापुढे मात्र नवकाव्याला रसव्यवस्था अपर्याप्त आहे हें पटल्यावर ह्या पांघरुणाला ठिगळें जोडण्यांत अर्थ नाही आणि त्यांत कोंबण्यासाटीं नवप्रवृत्तींचे हातपाय तोडणेंहि शक्य होणार नाही. तेव्हा या प्रस्तर झालेल्या रसाला सूक्ष्म असें वायुरूप धारण करून येण्यासाटी 'वातचक्रां'त भिरकावून दिला पाहिजे ! तो आडवा आला म्हणजे काव्यचर्चा त्यावर ठेंचाळणारच.

सर्व कलांचें मूलतत्त्व—भाव

प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्राने रसिकाकडे व त्याच्यामध्ये होणाऱ्या भावनाजागृतीकडे आपलें लक्ष विशेष पुरवलें. उलट पाश्चात्यांनी काव्याच्या निष्पत्तीवर, कवीवर आपलें लक्ष केंद्रित केलें. या दोन्ही दृष्टिकोनांना, 'कविस्तु सामाजिक तुल्य एव' या न्यायाने कवि व वाचक यांना समान असलेलें तत्त्व, संस्कृत साहित्यशास्त्र, आधुनिक साहित्यशास्त्र व सौंदर्यामीमांसा यांचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां सांपडतें. तें म्हणजे 'भाव'. केवळ काव्यच नव्हे तर ललितकलेच्या सर्व प्रकारांत अनुस्यूत असलेलें तत्त्व 'भाव' हेंच होय.

खुद्द भरताने 'न भावहीनोऽस्तिरसाः न भावो रसवार्जितः' असें म्हणून 'भावा'ला रसाच्या बरोबरीचा दर्जा दिला. पण विश्वानाथानंतर रस इतका व्यापक झाला की त्याने 'भावा'ला आपल्यांत सामावून घेतलें. पाश्चात्य काव्यमीमांसेंतील काव्याच्या मुळाशी असलेलें तत्त्व जें feeling, emotion किंवा expression, त्याचा समावेश 'भाव' या शब्दांत होणार नाही काय? तसेंच पाश्चात्य सौंदर्यशास्त्राने सूक्ष्म विचारांतीं आतां सर्व ललितकलांचें मूलतत्त्व सौंदर्यसंवेदनक्षमता (aesthetic sensibility) किंवा सौंदर्यभाव (aesthetic emotion) हेंच निश्चित केलें आहे. या दृष्टीने 'भाव' (म्हणजेच सौंदर्यभाव) हें तत्त्व कसें कलामूलगामी आहे, तें दिसून येईल. काव्यानुभूतीच्या सर्व क्षत्रांत 'भावा'चें अस्तित्व दिसून येतें.

काव्याचें उपकरण-प्रतिमा

ललितकला व काव्य यांमधील भावतत्त्वाचें आकलन होण्यासाटी त्या त्या कलांचें माध्यम व उपकरणें पाहिलीं पाहिजेत. कोणत्या सृष्टमात्राचा बोध आपल्याला कोणत्या तरी ज्ञानेंद्रियद्वारांच होतो. कर्ण, त्वचा, नेत्र, जिव्हा व घ्राण हीं पंचेंद्रियें आणि अनुक्रमे शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे त्यांचे पांच विषय सुप्रसिद्ध आहेत. सृष्टमात्राचें इंद्रियगोचर अंग म्हणजे कलेचें माध्यम होय. ललितकलांपैकी संगीतांत शब्दाचें, चित्रकलेंत रूपरंगाचें, शिल्प व नृत्य या कलांत स्पर्श व रूप यांचीं व नाट्यकलेंत शब्द-स्पर्श-रूप यांचीं ज्ञानेंद्रियें वापरावीं लागतात. या सर्व कलांना विशिष्ट ज्ञानेंद्रियगत अनुभवाची आवश्यकता आहे. काव्यकलेचें

स्वरूप यांहून वेगळें आहे. काव्याचीं स्थूल उपकरणें म्हणजे अर्थयुक्त वर्णोच्चार किंवा शब्द होत. त्यांचें ज्ञान आपणाला कर्णद्वारा श्रवण करून, नेत्रद्वारांवांचून किंवा स्पर्शानेहि (ब्रेल लिपिच्या साह्याने) करून घेतां येतें. त्यांच्यापासून होणाऱ्या बोधाला अमूकच एका ज्ञानेंद्रियाची अशी अविनाभाव आवश्यकता नाही.

पण शब्द हीं काव्याचीं स्थूल उपकरणें. काव्यामधील संवेदना निव्वळ शब्दांनीं होत नाहीत. शब्दांपासून निर्माण होणाऱ्या शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध अशा पंचविध प्रतिमा [images] हीं काव्याचीं सूक्ष्म उपकरणें होत. इतर कलांच्या मानाने काव्याला लाभलेलें हें शब्दार्थांचें साहित्य अनंतपार आहे. काव्येतर कलेंत कर्णनेत्रत्वक् इत्यादिद्वारा येणाऱ्या भावानुभावापेक्षा काव्यांत शब्दार्थांच्या साहित्यांतून निर्माण होणाऱ्या असंख्य सूक्ष्म प्रतिमांनी प्रतीत होणारा सौंदर्यभाव अधिक सूक्ष्म, अधिक तीव्र व अधिक कार्यक्षम असतो.

भावप्रतीति

अर्थात सर्व कलांचा अनुभव सरतेशेवटीं 'इंद्रियेभ्यः परं' अशा मनालाच येणार. मात्र काव्यामध्ये विशिष्ट ज्ञानेंद्रियांना येणाऱ्या अनुभवाला गौण स्थान असून त्या अनुभवापलीकडील जाणीवेला म्हणजे प्रतीती (realisation) ला अधिक महत्त्व आहे. सारांश सर्वच ललितकलांप्रमाणे काव्यसंवेदना ही अनुभवरूप किंबहुना प्रतीतिरूप असून पंचविषयात्मक सूक्ष्म प्रतिमासृष्टि हें काव्याचें उपकरण होय. सोवियत काव्यमीमांसक बुखारीन याने म्हटल्याप्रमाणे 'काव्यनिष्ठ विचार हा प्रतिमांच्या संज्ञांनी केलेला विचार होय. (poetic thought is thought in terms of images) काव्यकलेंत शब्दस्पर्शरूपरसगंधात्मक प्रतिमासृष्टीच्या सहाय्याने कलावंताच्या मतीवर आलेला भावांचा फुलोरा, हृदयसंवादामुळे कलास्वादकाच्या मनावर संक्रमित होतो. हीच भावप्रतीति होय.

भावप्रतीतीच्या एका विवक्षित अवस्थेस संस्कृत साहित्यशास्त्रांत 'रस' ही संज्ञा दिली असून तोच रसमीमांसकांचा काव्यानंद होय. याचें स्वरूप निर्विकल्प व सुखदुःखात्मक असतें. केशवसुतांच्या 'झपूर्झा' प्रमाणे निर्द्वंद्व, निरुपाधिक व निर्विकल्प स्थिति ही काव्यानंदाची अवस्था होय. 'रस हे सुखदुःखात्मक आहेत' अशी कांहींची समजूत बरोबर नाही.

भावगन्ध

विविध भावांच्या विवक्षित संयोगापासून परिपुष्ट होणाऱ्या स्थायीभावाला संस्कृत साहित्य-शास्त्रकारांनी 'रस' ही विशिष्ट संज्ञा कां दिली तें पाहिलें पाहिजे. इतर कलांतील ज्ञानेंद्रियजन्य अनुभव शब्दस्पर्शरूपद्वारा मिळतो. पण अमूर्त अशा स्थायींचें परिपुष्ट स्वरूप, दर्शविण्यासाठी—अनेक भावांच्या संयोगाने निष्पन्न होणाऱ्या या संकीर्ण अनुभवासाठी—त्यांनी चर्वणेने आस्वाद्य होणाऱ्या संमिश्र

पानकरसाच्या रूपकांतून 'रस' ही इंद्रियांना अनुभवतां येणारी मूर्त संज्ञा शोधून काढली. 'भाव' ही संज्ञा रसाइतकीच जुनी. पण भावकल्पनेच्या आधुनिक दृष्टीने व्यापकपणे विचार केल्यास, जिव्हेंद्रियाच्या ढोबळ विषयाचा वाचक असलेला घनरूप असा 'रस' भावप्रतीतीचें सूक्ष्मतरल व व्यापक स्वरूप व्यक्त करण्यास असमर्थ आहे ! मराठी साहित्यशास्त्राला नव्या साहित्याच्या संगतीने चालावयाचें असल्यास प्रतीतीसाठी सर्व कलाप्रांताला समावेशक अशी 'भाव-गंध' ही नवीन मूर्त संज्ञा मी सुचवूं इच्छितों.

अमूर्त 'भावा'ला मूर्त 'गंधा'ची जोड देण्याचें कारण काय हें अमूर्त तसेंच मूर्तहि आहे. मात्र विभावादिकांपासून रस निष्पन्न होतो तसा भावापासून गंध निर्माण होत नाही, तर भाव हाच गंध होय. ज्ञानेश्वरांनीहि ' भावांच्या परिमला ' चा उल्लेख केला आहे. फळाच्या रसरसलेल्या अवस्थेंतून उत्पन्न होणाऱ्या भावाला गंध हें अभिधान किती समर्पक आहे ! भाविकाने एकदा भावगंध घेतला, की त्याच्या मनावर कविगत भावाचा संस्कार कायमचा टिकतो. मनाची ही संस्कारित अवस्था म्हणजे काव्यादि कलांचें परम ध्येय होय.

लोक विचारतात, ' कवीचें जीवन पुण्यमय असलें पाहिजे का ?' कुणी याचें आग्रहाने उत्तर देतात ' अवश्य असलें पाहिजे. ' दुसरे म्हणतात ' तशी कांही गरज नाही. ' मला कवीचें पुण्यमय जीवन हवेंच आहे. पण मी ह्या दुसऱ्या पक्षाला दुजोरा द्यायलाहि तयार आहें. मी म्हणतों कवि पापी का असेना; तो खरा पापी असो म्हणजे झालें. चांगला मन लावून पाप करणारा असला पाहिजे. मधून मधून पुण्याचा बुरखा घेणारा, पापाचें ढोंग करणारा नाही चालायचा. खरा निष्ठावान पापी पाहिजे. तसा असला तर तो वाटल्यास नरकांत जाईल पण त्याच्या काव्याने मी मोक्ष गाठूं शकतों.

—विनोबा

विदर्भ साहित्य मंदिर कसें असावें ?

डॉ. यशवंत खुशाल देशपांडे

☆

प्राचीन विदर्भाची व्याप्ती

वेदकालापासून ख्यातनाम असलेला विदर्भ हा एके काळीं फार विस्तृत होता. उत्तरेस अगदी नर्मदेपर्यंत, पूर्वेस वैनगंगा नदीपर्यंत, पश्चिमेस गुर्जरप्रांतापर्यंत व दक्षिणेस गोदावरीच्या परिसरापर्यंत प्राचीन विदर्भाची व्याप्ती होती. मराठी भाषेचें जतन आणि संवर्धन याच भागांत झालें असून, मराठी भाषेचे आज उपलब्ध असलेले आद्यग्रंथ याच भागांत निर्माण झाले. विस्तृत अशा महाराष्ट्राचा हा उत्तर प्रदेश, मराठी भाषेच्या दृष्टीने, महत्त्वाचा आहे. पण, अनेक शतकांच्या राजकीय घडामोडींमध्ये कधी महाराष्ट्राशीं संलग्न तर बहुधा विलग अशी विदर्भाची स्थिति होती. आज विदर्भ म्हणजे हल्लींचें वऱ्हाड हीच आकुंचित कल्पना दृढ आहे. तथापि विदर्भ,—ज्याला महाविदर्भ हें नांव हल्ली देण्यांत येतें,—त्या मर्यादेंत मध्यप्रदेशांतील नागपूरप्रमुख मराठी विभाग, निजामच्या राज्यांतील मराठवाडा आणि खानदेशांतील जळगांवप्रमुख पूर्व विभाग एवढ्या प्रदेशाचा अंतर्भाव होतो. विदर्भाची हीच मर्यादा लक्षांत घेऊन विदर्भ साहित्यसंघाची स्थापना करण्यांत आली.

विदर्भ साहित्यसंघाची स्थापना कां केली ?

वास्तविक सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या विदर्भ हा महाराष्ट्राचाच भाग असून राजकीय दृष्ट्या मात्र तो महाराष्ट्रापासून विलग राहिला. त्यामुळे मराठी भाषेचें आणि मराठी वाङ्मयाचें मूळ तोच प्रदेश असूनहि महाराष्ट्राच्या मागे राहिला. महाराष्ट्र साहित्यपरिषदेने मराठी भाषेच्या आणि वाङ्मयाच्या अभिवृद्ध्यर्थ चालविलेल्या प्रयत्नांचाहि विदर्भास फायदा होऊं शकला नाही. कारण राजकीय दृष्ट्या विदर्भ हा निराळ्या प्रांताचा घटक आहे, ही गोष्ट लक्षांत घेऊन, मराठी भाषा आणि वाङ्मय यांच्या जोपासनेकरिता, विदर्भांत संघटित प्रयत्न करावा, म्हणून विदर्भ साहित्यसंघ स्थापन करण्याची कल्पना प्रथम सन १९२२ सालीं निघाली. उमरावतीस कविभूषण प्रा. बळवंतराव खापर्डे यांनीं पुढाकार घेऊन विदर्भांतील साहित्यिकांशी विचारविनिमय केला, व त्यांच्या सहकार्याने संघाची स्थापना करण्यांत आली आणि संघाचें पहिलें

अधिवेशन अमरावती येथे प्रथितयश साहित्यिक कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली ब्रह्मविद्यामंदिरांत भरविण्यांत आलें.

संघाचा उद्देश आणि अधिवेशनें

वाङ्‌मयीन हस्तलिखितें आणि ऐतिहासिक साधनसामुग्री एकत्रित करणें व त्यांचा संग्रह करणें, पुरस्कृत आणि स्वीय अशा ग्रंथांचें प्रकाशन करून ग्रंथकारांना उत्तेजन देणें, संमेलनें, प्रदर्शनें, व्याख्यानें घडवून आणून मराठी वाङ्‌मयाचा जनतेंत प्रचार करणें इत्यादि बहुविध उद्देश संघानें आपल्या कार्य-क्षेत्रांत अंतर्भूत केले होते. संघाची कल्पना मूर्त स्वरूपांत येऊन संघ-स्थापना झाली, तेव्हापासूनच संघाशी माझा या ना त्या प्रकारें संबंध अव्याहत चालू आहे. संघाचें दुसरें अधिवेशन अमरावती येथे वऱ्हाडचे सुप्रसिद्ध साहित्यिक आणि इतिहासकार कै. या. मा. काळे यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यांत आलें. त्यानंतर तिसरें अधिवेशन यवतमाळ येथे स. १९२५ साली साहित्यसम्राट कै. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आलें. त्यावेळी ना. बापूजी अणे हे स्वागताध्यक्ष आणि मी चिटणीस होतों. पुढे जळगांव (खानदेश), हैदराबाद, नागपूर आणि अमरावती येथे अधिवेशनें भरविण्यांत आलीं.

सात वर्षांच्या सुप्तावस्थेनंतर

अमरावतीस सन १९३७ मध्यें प्रा. न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखालीं अधिवेशन झाल्यावर संघाला एक प्रकारची शिथिलता आली. जवळ जवळ सात वर्षें संघ लुप्तप्राय होता. परंतु प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या खटपटीनें संघाची ही सुप्तावस्था नष्ट होऊन तो पुनश्च नव्या दमानें कार्य करूं लागला; व पुनरुज्जीवनानंतरचें प्रथम अधिवेशन सन १९४४ मध्यें अकोट येथे भरलें त्यावेळीं अध्यक्षपदाचा मान मला देण्यांत आला होता. त्यापुढे प्रतिवर्षी दर्यापूर, पुसद, गोंदिया इत्यादि ठिकाणीं अधिवेशनें भरून संघाच्या कार्याला नवीं नवीं क्षेत्रें निर्माण करण्यांत आलीं. पुनरुज्जीवनापासूनच कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी यांच्यासारखा कार्यक्षम, निरलस असा सरचिटणीस मिळाल्यामुळे संघाची उत्तरोत्तर भरभराट झाली. गेलें संमेलन नुकतेंच डॉ. मा. गो. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यांत आलें. आणि चालू वर्षाकरिता संघानें प्रभावी वृत्त-पत्रकार, नामवंत टीकाकार आणि प्रथितयश ललितवाङ्मयलेखक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची कार्याध्यक्ष म्हणून निवड केली आहे आणि त्यांच्याच अध्यक्षतेखालीं संघाचें आगामी अधिवेशन भरविण्यांत येईल.

विदर्भ साहित्यमंदिराची आवश्यकता

संघाच्या कार्याचा व्याप जसजसा वाढत चालला, तसतशी विदर्भ साहित्य संघाकरितां स्वतःची अशी प्रशस्त जागा आणि इमारत असणें अवश्य आहे, याची उणीव भासू लागली; व ती इमारतहि महाराष्ट्राच्या उत्तर प्रदेशाचें केंद्र

जें नागपूर शहर तेथे असणें सर्व दृष्टीने श्रेयस्कर आहे, अशीहि जाणीव निर्माण झाली. मराठी भाषा आणि वाङ्मय यांच्या अभिवृद्धीकरिता विदर्भ साहित्य संघामार्फत नागपूर येथे प्रमुख स्थानीं भव्य असें विदर्भ साहित्यमंदिर बांधण्यांत यावें या दृष्टीने विशेषत: नागपूर येथील प्रमुख, वजनदार अशा मराठी भाषेच्या अधिकाऱ्यांनी कार्यासहि प्रारंभ केला आहे. आम्हांस अशी उमेद आहे की, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर हे कार्याध्यक्ष असतांनाच विदर्भ साहित्यमंदिर मूर्त स्वरूपांत येईल. तेव्हा विदर्भ साहित्य मंदिरासंबंधीची माझी कल्पना काय आहे, या मंदिराचें स्थापत्य आणि शिल्प कोणत्या प्रकारचें असावें, या मंदिरांत संघाच्या कार्यक्षेत्रांत येणाऱ्या शाखांची सोय कशी असावी, यासंबंधींचे विचार मंदिर बांधण्याच्या कार्यास प्रवृत्त झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांपुढे, ज्यांच्या उदार देणगीच्या भरवंशावर कार्यकारी मंडळाने हें मंदिराचें कार्य हातीं घेतलें आहे, त्या दानशील आणि धनिक अशा मराठी भाषेच्या आणि वाङ्मयाच्या अभिमानी जनतेपुढे विचारार्थ मांडीत आहें.

रंगमंचासह सभागृह आणि अदाह्य दालनें

प्रथमतःच हें नमूद करणें अवश्य आहे की माझे हे विचार केवळ कल्पनेवर आधारलेले नसून, माझ्या युरोपच्या आणि भारताच्याहि प्रवासांत वेळोवेळीं मीं ज्या अनेक साहित्यिक संस्था पाहिल्या आहेत आणि तेथील कार्यपद्धतीचें जें निरीक्षण केलें आहे, त्या निरीक्षणावरच हे विचार आधारलेले आहेत. सर्वप्रथम या मंदिरास एक प्रशस्त सभागृह असावयास पाहिजे. या सभागृहांत एक हजार प्रेक्षक बसू शकतील असें तें विस्तृत पाहिजे. रंगमंचासारखा उपयोग करता यावा, एवढें विस्तृत व्यासपीठ त्या सभागृहांत असावयास पाहिजे. कलकत्त्याच्या वंगीय साहित्य परिषदेंत ज्याप्रमाणे वंगीय साहित्यिक, कवि आणि ग्रंथकार यांची तैलचित्रें लाविलेलीं आहेत, त्याप्रमाणे या सभागृहांत महाराष्ट्राचे आणि विशेषतः विदर्भाचे नामवंत कवि आणि ग्रंथकार यांचीं त्यांच्या आयुष्यांतील घटनांच्या आणि त्यांनी निर्माण केलेल्या ग्रंथांच्या त्रोटक नोंदीसह तैलचित्रें प्रमुख स्थानीं लावावयास पाहिजेत. मराठी भाषेतील व संस्कृत इत्यादि अन्य भाषांतील छापील ग्रंथसंग्रहाकरितां, त्या भाषांतील हस्तलिखित ग्रंथांकरितां आणि ऐतिहासिक साधन सामुग्री आणि साहित्यिक व ऐतिहासिक वस्तुसंग्रहाकरितां निरनिराळीं अदाह्य (Fireproof) दालनें या मंदिरांत असावयास पाहिजेत. लंडन येथील ब्रिटिश म्युझिअम, बनारस येथील नागरी प्रचारिणी सभा इत्यादि अनेक ठिकाणी अशी स्वतंत्र व्यवस्था केली आहे. विदर्भातील नामवंत साहित्यविषयक संस्था, मध्यप्रांत संशोधन मंडळ, नागपूर आणि शारदाश्रम, यवतमाळ, या संस्थाहि विदर्भ साहित्यसंघाच्या कार्याच्या क्षेत्रांतच कार्य करीत असल्यामुळे त्यांनी संग्रहित केलेला हस्तलिखित ग्रंथसंग्रह आणि ऐतिहासिक साधनसामुग्री आणि वस्तुसंग्रह यांचाहि समावेश या मंदिरांत, संलग्न संस्था म्हणून, अंतर्भूत होणें हें संघकार्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचें आहे.

अभ्यासगृह आणि वसतिगृह

अशा तऱ्हेची साधनसामुग्री नागपूरसारख्या मध्यवर्ती ठिकाणीं केंद्रित झाली असतां मराठी भाषेच्या आणि वाङ्मयाच्या संशोधनाच्या दृष्टीने आणि नवीन ग्रंथ रचण्याला लागणाऱ्या संदर्भाच्या दृष्टीने विदर्भ साहित्यमंदिर हें अभ्यासाचें केंद्र होईल. डॉक्टरेट मिळविण्याकरितां प्रबंध लिहिणारे, मराठी भाषेचें अथवा वाङ्मयाच्या एखाद्या शाखेचें संशोधन करणारे आणि नवीन ग्रंथ लिहिणारे या सर्व प्रकारच्या विद्वानांना विदर्भ साहित्यमंदिर हें अभ्यासाकरिता एक प्रमुख स्थान होईल. त्या दृष्टीने विद्वानांना अभ्यास करण्यास सोईचें व्हावें म्हणून या मंदिरांत अभ्यासाकरिता उपयुक्त अशा सोयींसह एक विस्तृत अभ्यासगृहहि असावयास पाहिजे. अशी अभ्यासगृहाची सोय ब्रिटिश म्युझिअममध्ये प्राच्यविद्या शाखेकरतां वेगळी आणि सर्व साधारण वेगळी अशी करण्यांत आली आहे. अशा तऱ्हेच्या अभ्यासाच्या सोयी पॅरिस येथील बिब्लिओथिक नॅशनल आणि रोम येथील पोपच्या व्हॅटिकन लायब्ररींत वगैरे केलेली आहे. अशीच सोय कलकत्याच्या इंपिरिअल (आतांच्या नॅशनल) लायब्ररींतहि केलेली आहे. अशा सोयींमुळे अभ्यासू विद्वानांच्या कार्यास संस्थेचा फार मोठा उपयोग होतो. नागपूर सारख्या केंद्रस्थानीं बाहेरचेहि विद्वान् अभ्यासू कांही दिवस अभ्यासाकरतां येण्याचा संभव आहे. त्यांच्या तात्पुरत्या राहण्याकरितां साहित्यमंदिराच्या आवारांतच छोटेसें वसतिगृह असणें सोयीच्या दृष्टीने फार आवश्यक आहे. अशी सोय पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळांत आहे. या सर्व सोयी लक्षांत घेऊन आणि संघाच्या वाढत्या कार्यक्षेत्राचा विचार करूनच या साहित्यमंदिराची उभारणी करावी, अशी कार्यकारी मंडळाला विनंती आहे. अशा सर्व सोईंनी युक्त असलेल्या मंदिराच्या उभारणीला सुमारे तीन लाख रुपये खर्च येईल, असें वाटतें.

मंदिराचें शिल्प आणि स्थापत्य

विदर्भ साहित्यमंदिर हें मराठी भाषेचें, मराठी वाङ्मयेतिहासाचें आणि मराठी संस्कृतीचें या भागांतील महाराष्ट्राचें प्रमुख केंद्र होणार आहे. त्या दृष्टीने या मंदिराचें शिल्प आणि स्थापत्य यांची मांडणी व्हावयास पाहिजे. आजची मराठी भाषा आणि वाङ्मय याला ज्याप्रमाणे अनेक शतकांच्या पूर्वपरंपरेची पार्श्वभूमि आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या आणि विशेषतः विदर्भाच्या स्थापत्याला, शिल्पाला आणि मूर्तिकलेला हजारो वर्षांची पार्श्वभूमि आहे. आजहि महाराष्ट्रांत आणि विशेषतः विदर्भांत दोन हजार वर्षांपासूनचे स्थापत्याचे, शिल्पाचे आणि मूर्तीचे नमुने विद्यमान आहेत. महाराष्ट्राच्या स्थापत्य, शिल्प आणि मूर्तिकला इत्यादि-कांना भारतीय संस्कृतीच्या इतिहासांत स्वतंत्र स्थान आहे. तथापि अद्याप पावेतो त्यांच्या संशोधनाकडे आणि अभ्यासाकडे विद्वानांचें पाहिजे तितकें लक्ष वेधलें नाही. साक्षेपी विद्वानांनी या गोष्टींकडे अवश्य लक्ष द्यावें.

विदर्भातील प्राचीन शिल्प, स्थापत्य आणि मूर्ति

मंदिराची उभारणी करतांना महाराष्ट्राचें स्थापत्य, मूर्तिकला इत्यादिकांचें प्रतीक या मंदिराच्या निर्मितीमध्ये दिसावें आणि हें मंदिर महाराष्ट्राच्या संस्कृतीचें बोधचिन्ह व्हावें, या दृष्टीने कार्य करतांना कार्यकारी मंडळाला सोयीस्कर व्हावें, म्हणून अशा प्रकारचें स्थापत्य, शिल्प आणि मूर्तिकला विदर्भांत कोठे कोठे आहे, हें मी येथे थोडक्यांत नमूद करतो. इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंतचीं वैदिक, बौद्ध व जैन लेणीं विदर्भांत विद्यमान आहेत. पहिल्या दुसऱ्या शतकांतील भांदक येथील बौद्ध लेणीं, तिसऱ्या शतकापासून पांचव्या, सातव्या शतकापर्यंतचीं अंजठा येथलि बौद्ध लेणीं, दहाव्या शतकांतील वेरूळ येथील प्रसिद्ध कैलास लेणें आणि त्यापूर्वीचीं तेथील बौद्ध व जैन लेणीं आणि तेराव्या शतकांतील महानुभावीय ग्रंथांत उल्लेख असलेलीं माहूर येथील वैदिक धर्माचीं लेणीं, तसेंच दहाव्या शतकांतील पातूर येथील व सालबर्डी येथील लेणीं या दृष्टीने महत्वाचीं आहेत. लोणार येथील दैत्यसूदनाचें मंदिर, मालेगांव येथील शिवमंदिर आणि वणी तालुक्यांतील वर्धा आणि पैनगंगा नदीच्या संगमावरील जुगाद येथील मंदिरें हीं चालुक्य स्थापत्याचा नमुना आहेत. गुप्तांशी संबंध असलेल्या वाकाटक वंशाची एक राजधानी वाशीम येथे तिसऱ्या शतकापासून पांचव्या शतकापर्यंत होती. आज तेथे वाकाटकांच्या स्थापत्याचे नमुने दाखविण्यांत येत नाहीत. त्या दृष्टीने प्रयत्नहि झाला नाही. तथापि संशोधनाने वाशीम येथे अथवा त्याच्या परिसरांत जीं अनेक प्राचीन मंदिरें काटे वगैरे ठिकाणीं आहेत, त्यांमधून तत्कालीन स्थापत्याचे नमुने सापडण्यासारखे आहेत. चालुक्यांच्या नंतरचे राष्ट्रकूट राजे यांच्या वेळचेंहि स्थापत्य आज विदर्भांत दाखविता येत नाही. तथापि त्यांनी विदर्भांत मंदिरांना दान दिल्याचे अनेक ताम्रपट उपलब्ध आहेत. तेव्हा प्रयत्नान्तीं त्यांचेंहि स्थापत्य मिळूं शकेल. देवगिरीच्या यादवांचें राज्य विदर्भावर एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत होतें. त्यांच्या काळीं निर्माण झालेलीं अनेक मंदिरें आज सर्व विदर्भांत अस्तित्वांत आहेत. त्यांत स्थापत्याच्या आणि कलेच्या दृष्टीने लोणार येथील, पुसद येथील, पाडखेड, यवतमाळ येथील मंदिरेंहि उल्लेखनीय आहेत. पुसद, शिरपूर येथील प्राचीन जैन मंदिरें हीं त्या दृष्टीने महत्वाचीं आहेत. वाकाटक-गुप्तांच्या काळांतच वैदर्भीय मूर्तिकला अत्यंत प्रगल्भतेला गेली होती.

विदर्भातील मूर्तिकला

आजहि विदर्भांत शेकडों मूर्तिकलेचे उत्कृष्ट नमुने म्हणून दाखवितां येतील, त्या दृष्टीने माना येथे सांपडलेली रामपंचायतनाची मूर्ति, वाशीम--मेहेकर येथे बालाजी म्हणून प्रसिद्ध असलेल्या अनुक्रमे जनार्दन आणि शार्ङ्गधरांच्या मूर्ति, सावळापूर येथील नारायण मूर्ति, बयनद येथील नारायणाची मूर्ति या उदाहरणादाखल दाखवितां येतील. मूल तहसिलींत वैनगंगेच्या तीरीं मार्कंड येथे असलेलीं जीर्ण मंदिरें, तेथे असलेल्या शिलालेखांवरून पांचव्या शतकापासून तरी अस्ति-

त्यांत आहेत. मार्कंडेश्वराच्या मंदिराचें स्थापत्य आणि त्यावर कोरलेल्या वैदिक मूर्ति अभ्यसनीय आहेत. चांदा, बल्लारशाह आणि माणिकगड येथील गोंडांचें स्थापत्य जरी विदर्भांतील स्थापत्यावर आधारलेलें असलें, तरी त्यांच्या संस्कृतीचे संस्कार जागोजाग त्या स्थापत्यावर आढळून येतात. चांदा येथील लाल पेठेंतील विशाल प्रस्तरमूर्ति आणि अचलेश्वराजवळील गोंड राजांच्या समाधीवरील नकशीकाम उल्लेखनीय आणि अनुकरणीय आहे. नागपूरकर भोसलेहि स्थापत्यसंवर्धनांत मागे नव्हते. नागपूर येथील रुक्मिणीचें मंदिर आणि नागपूर शहरांतील व त्याच्या परिसरांतील तत्कालीन अनेक मंदिरें भोसल्यांच्या स्थापत्याचा आणि कलाकुसरींचा अभ्यास करण्याला उपयुक्त आहेत. सारांश, विदर्भाच्या संस्कृतीला पोषक असें स्थापत्य, शिल्प आणि मूर्ति आज विदर्भांत दोन हजार वर्षांपासूनचे विद्यमान आहेत. प्रस्तुत लेखक त्या विषयाचा तज्ज्ञ नाही तथापि तज्ज्ञांना उपयुक्त अशा साधनसामुग्री विदर्भांत विद्यमान आहेत, हें स्वतःच्या निरीक्षणावरून तो निश्चितपणे सांगू शकतो. प्रस्तुत विदर्भ साहित्यमंदिराच्या रचनेमध्ये हें स्थापत्य, शिल्प आणि मूर्तिकला यांचा तज्ज्ञांच्या सल्ल्याने उपयोग करण्यांत यावा, या एकाच दृष्टीने वरील दिग्दर्शन केलें आहे. याचा कार्यकारी मंडळाने अवश्य विचार करावा.

रसिक दानशूरांना विनंती

प्रस्तुत मंदिर हें मराठीच्या वैभवाचें केंद्र म्हणून निर्माण करणें आजच्या परिस्थितींत जितकें अवश्य आहे, त्यापेक्षाहि त्या मंदिराचें महत्व आगामी पिढ्यांना उपयुक्त होणारें आहे. हें मंदिर निर्माण करण्यांत जे जे हातभार लावतील, त्यांना आगामी पिढ्या धन्यवाद देऊन त्यांच्या सदैव ऋणी राहतील. या मंदिराच्या निर्मितीस निश्चितपणे किती पैसा लागेल, हें जरी आज सांगता आलें नाही, तरी अडीच तीन लाखापर्यंत पैसा या कामी खर्च होईल, हे स्पष्ट आहे. ग्रंथशाळा, हस्तलिखित ग्रंथालय, वस्तुसंग्रह आणि विशेषतः सभागृह ही एकेकट्या धनिकाने आपलें स्मारक म्हणून बांधून देण्यासारखी आहेत. आणि त्या विभागाला एकेका व्यक्तीचें स्मारक म्हणून जर नांव देण्यांत आलें, तर तें चिरंतन आणि योग्य असें स्मारक होईल. विदर्भांतील उदार आणि धनिक अशा मराठी भाषेच्या आणि वाङ्मयाच्या अभिमान्यांनी या मंदिराच्या पूर्ततेकरितां सढळ रीतीने हातभार लावावा, अशी नम्र विनंती करून हा लेख पूर्ण करतों.

नवी मळवाट*

नारायण गणेश पूरकर

☆

कवीची प्रस्तावना जितकी ठसठशीत आणि अर्थपूर्ण आहे तितकेंच त्याचें काव्य पुष्ट आणि विचारपरिपूर्ण आहे. आजच्या जगाचें दर्शन घडवितांना कवीने समाजांतील अंगोपांगाचे पापुद्रे मोठया चिकित्सेने आणि कुशलतेने उकलून जें सत्यदर्शन घडविलें व विचारांना जी चालना दिली त्याबद्दल जनता त्यांना धन्यवादच देईल. श्री. मुक्तिबोधांचें काव्य केवळ कल्पना रम्यतेवर उभारलेलें नाही ही समाधानाची गोष्ट आहे. त्यांची संपूर्ण काव्यसंपदा अनुभूतींतून जन्मास आलेली असून तिचें स्वरूप जसें दर्शनीय तसेंच विचारप्रवणहि आहे. त्यामुळे वस्तुस्थितीचें आकलन होऊन वाचकांत नवचैतन्याचा संचार होतो इतकें हें काव्य प्रभावी आहे. एका 'नवीन मळवाटे'वरून कवि जनसमूहाला फैलावत जाणाऱ्या प्रकाशाच्या मार्गाकडे—ध्येयबिंदूकडे नेण्याचा प्रयत्न करतो आणि उद्याच्या होऊं घातलेल्या नवजगाचें, सूर्ययुगाचें अगदी स्पष्ट चित्र उभें करतो यांतच कवीच्या काव्याचा खरा आत्मा आढळतो.

नवी मळवाट। नवीनच घाट। नवीन क्षितिजें महा अफाट

अशी प्रगतिशील भव्य सीमारेषा आंखून त्या सीमारेषेच्या अगदी टोंकाला जनता पोंचल्यावर तिला—

भिजवितील लक्ष गरीब तहानलेल्या पृथ्वीवरचा महा सहारा !
नवे निर्झर सूर्य-युगाचा जाणती पत्ता
जेथे केवळ प्रकाशाचीच निर्बंध सत्ता !

या प्रकारचें दिव्यज्ञान घडून ती समाधानाचा निःश्वास टाकील अशी दुर्दम्य आशा कवीने प्रगट केली आहे. 'आरंभ' बिंदू आणि 'अंत' बिंदू सांधतांना किंवा आरंभ बिंदूपासून अंताच्या बिंदूकडे जातांना जनता कोणकोणत्या सुख दुःखांतून पुढे सरकत जाईल यांचेंहि हृदयस्पर्शी चित्रण कवीने केलें आहे. तो म्हणतो—

*(मागील अंकावरून संपूर्ण)

व्याकुळ या उरीं जळ कांही तरि दृष्टि ध्रुवांवरती स्थिरते
दुर्गम अतिशय पंथ सुनिश्चित पुढेच पाउल नित पडतें
सरळ किशोरी जीव लावि ना ! विसर क्षणाचें मृदु नातें
पाठिशिं सुखदु:खाचें ओझें !

पीडित समाज पाहून कवीचें हृदय पिळवटून निघतें. तो आपल्या सुखद जीवनाचाहि त्याग करावयास प्रवृत्त होतो. इतरांचीं दु:खें पाहून त्याचें मन चिंतामग्न होतें; पण तो निराश होत नाही. तो तळतळून उद्गारतो,

फोडीन कधी तमाची छाती कोसळतील प्रकाशधारा ?
करीत कधी बलाढ्य असा माझ्या प्रज्ञेचा प्रचंड मारा ?
मारीन कधी गळा दाबून जुन्या पापांचे क्रूर राक्षस ?
कधी करीन जिवंत, रुद्ध—थिजलेलें हें जीवन—गीत ?

कवीने 'माझ्या पीडेला अर्थ येईल?' ह्या आपल्या कवितेंत केवढें कष्टाचें बळ एकवटलें आहे याची जाणीव होते. कवी सभोवार नजर टाकतो. त्याला राबलेल्या जाणाऱ्या जनतेचे हाल पाहवत नाही. तो त्या खंगलेल्या जनतेला उद्देशून 'कष्टाचें गीत' गाऊं लागतो—

जीवाचे कोळसे दाबा हो आंत रक्ताची आंसवें रोखा डोळ्यांत
—हें कष्टाचें गीत......
खोदा रे खोदा सोन्याची खाण रक्तांच्या सड्यांत झळके सुवर्ण
—हें दुष्ट सुवर्ण
कष्टाचें गीत—मेलेल्या जीवांचं उदास गीत

'दुष्ट सुवर्ण' ह्या शब्दप्रयोगांत अभिप्रेत असलेला गहन अर्थ सर्वसामान्य मानवी जीवनाची मूल्यें कोणत्या परिस्थितीच्या कक्षेवर रुळत आहेत ह्याचें ज्ञान करून देतो. अशा वेळीं हें प्रखर गीत गातांना कवीच्या अंगांत रक्त सळसळूं लागतें आणि तो समाजाला आव्हान देऊन अज्ञात अशा एका जबर शक्तीची आराधना करतो—

ये नाशांतुन, मृत्यूतुन पीडेंतुन ये स्वागत !
ये अश्रूंतुन, अपमानांतुन, दैन्यांतुन ये—स्वागत !
ये तडफडत्या हृदयांच्या टपटपत्या रुधिरामधुनी
विश्वभक्षि रोषानल ज्वालांमधुनी ये तू स्वागत !

केवढी भयावह हाक आहे ही ! 'रुधिराच्या लाल सड्यांतच' ह्या कवितेंतून दिलेली ही हृदयभेदक हाक इतक्या रोषाने, इतक्या दाहकतेने कोणी दिली असेल असें वाटत नाही. अशी हाक देणारा कवी समाजाच्या अंत:करणांत किती खोल शिरला आहे! तो त्या अंधारांत चांचपडत पुढे जातो, किंचाळतो, पडतो

अन् पुन्हा पुढे सरकतो. भांबावल्यासारखी त्याची स्थिति होते पण तोल सांवरून तो धोक्याची सूचना देण्यासाठी 'लाल कंदिल' हातीं घेतो. त्या लाल प्रकाशांतून तो दर्शवितो—

बोळी मधल्या छाया अधिक गर्देशा होती
आळवी आर्त कंठ कुणाचा जागे कुणासी
" धाव रे रामराया, तूं किती अंत पाहसी ?
पश्चिमतीरीं धडधडणारी मृत दिसाची लालशी चिता—
विझते आता
लोपे अंतिम अंगार आणि
फोडून दिशा-कोट उसळे तमोदधीचा कल्लोळ मूक
बोळींच्या भिंतीवरून गळे अंधार-जळ
अधःकारास मिळे केवळ अंधार आणि —
झोपी जातांना गांजल्या अशा मानवी छाया
पाहत चिंताजनक अशा स्वप्नांची माया !

समाजांत प्रत्यही घडणारे असले सर्व प्रकार अनुभवून कवीचें हृदय भरून येतें, तो मनाची समजूत घालतो, नेत्र विस्फारतो, मुटी आवळतो आणि 'त्रिशंकूचें स्वप्न' रेखाटतांना पाशवी शक्तीपुढे आपली निधडी छाती पुढे करून म्हणतो—

एकहि स्पर्श, माझिया तनूंत स्मृतींचा रोमांच आणूं ना शके.
एकहि अर्थ, माझिया मनांत अजस्र श्रद्धेस ओतूं ना शके.
मनाचा हिलाल—सारखा जळतो, ज्वलन पिपासा थांबूं ना शके.
एकहि छंद मनाचा निर्बंध प्रवाह बोलका करूं ना शके.
तुझेंहि चारुत्व निसर्गप्रेयसी झालेली जखम भरूं ना शके.

निसर्ग—ज्याचेवर सर्व शक्ति निर्धारित आहेत तो कितीहि प्रिय असला तरी मानवाच्या हृदयांत मनुष्यत्व सांडून झालेली जखम कदापि भरून काढूं शकत नाही. त्याचा उपचार 'मनुष्यत्वा'नेच होणार असा दूरदर्शी बोधभाव व्यक्त करून कवी अशाहि जर्जर झालेल्या स्थितींतून मार्ग काढण्याचा निर्धार करतो.

पृथ्वीच्या आंतील लक्षावधि दिशा व्यापल्या तयांनी
आणीक निघन प्रचंड वळाने पृथ्वीच्या बाहेर
वृक्ष मी महान् !
लक्षावधि फांद्या लपल्या तयांनी
प्रत्येक हहाळी ? महान्, विशाल, जेंवि हो व्यक्तित्व !
आणीक आंतून उसळें चैतन्य
समुद्र बंदिस्त माझिया तनूंत

पृथ्वीचा आक्रांत माझिया अणूंत
पूर्णत्व आवेगें कोट्यावधी फुलें
हृदयाळ्या लपून फुलांच्याच ओव्ही
माझिया गीतांचीं रक्तिम फुलें तीं
झग्झर गळून झांकती खालचा
गर्गर फिरता पृथ्वीचा गोलक !

कोणी कितीहि प्रहार केले तरी न डगमगतां आपलें ध्येय गांठण्याचा कणखर बाणा कवि धारण करतो आणि शेवटीं 'असेंच आहे कांही' असें ठासून सांगतांना तो म्हणतो—

प्रत्येकाचा 'मी' हा आता 'आम्ही' जाहलेला आहे
यातनांच्या काळ्यभूत विश्वास पेरला आहे
आणि आहे कशाचीहि वाट सगळ्यांना आता
घृणेचिया धगधगल्या भाल्यावरती आता सारें
गुंढाळून टाकलेलें दुःखपूर्ण जिणें आम्ही......
असेंच आहे कांही
पिचूनिया रौरवांत
आम्ही मरणार नाहीं !

आशावादा बरोबर हक्कांची जाणीव ठेवून कवी आपला तीव्रतर आत्मविश्वास असल्या जळजळित शब्दांत प्रगट करतो.

श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या 'नवकाव्या'ची वैचारिक बैठक अशी जाज्वल्य स्वरूपाची आहे. तिची पातळी उच्च अन् निर्मळ आहे; तिचें अंग दणकट अन् प्रभावी आहे; तिची शक्ति जोरकस अन् प्रखर आहे आणि तिची व्याप्ति विशाल अन् तेजोमय आहे. आणि म्हणूनच त्यांची 'नवी मळवाट' हृदयाची पकड घेण्यास पूर्ण समर्थ आहे.

श्री. मुक्तिबोध हे अंतर्मुख प्रकृतीचे कवि असल्याने हृदयांत खोलवर सजलेले अनुभूतीचे पडसाद त्यांच्या काव्यांतूनहि मनोमय प्रतीत झालेले आढळून येतात. त्यांच्या प्रत्येक कवितेंत समाजांतील घडामोडींचें प्रतिबिंब इतकें उमटलेलें आहे की चाणाक्ष वाचक आपल्या सारासार विवेकबुद्धीने कर्तव्यनिष्ठेच्या एका मुक्कामावर येऊन पोचतो आणि मग त्याच्यांतील सहिष्णुवृत्ति ज्या प्रमाणांत जागृत होते त्याच प्रमाणांत ढोंगी, स्वार्थी आणि आसुरी वृत्तीच्या लोकांबद्दल त्याच्या मनांत घृणा उत्पन्न होते. कवीने आपल्या वास्तवदर्शी काव्यांतून ही जी किमया निर्माण केली ती खरोखरी अद्भुत आहे.

'नवी मळवाट' ह्या चैतन्ययुक्त काव्य-संग्रहांत आम्हाला आणखी एक महत्त्वपूर्ण गोष्ट आढळून आली ती म्हणजे कवीने दलितांच्या जीवनाची

जागरूकतेने घेतलेली दखल ही होय. ही दखल घेतांना कवि ज्या निरनिराळ्या मार्गांवरून जातो आणि तडफडणाऱ्या, विव्हळणाऱ्या व जर्जर झालेल्या असंख्य जीवांच्या जीवनाशीं समरस होऊन वाचकांचीं अंतःकरणें थरारून जातील अशी त्यांची मूर्तिमंत चित्रें उभी करतो तीं अभ्यसनीय आहेत. 'भविष्याच्या गर्भातल्या बाळाचें रुदन' ह्या कवितेंत कवीने समाजाच्या पोटीं होरपळत असलेले जीव कसे तडफडतात याचें भयावह चित्र रखाटलें आहे. तो म्हणतो—

मानवा! मानवा काय ही स्थिती? किड्यांचें मरण, जिण्याची भीती!
काय ही लाचारी! अलोट हें दुःख जाळतें जीवन भूक ही किती!

किंवा

पोट-पाठ एक, भाकरीचें स्वप्न पोटाचेच गोळे, फार मोठें विघ्न!
विका त्या बाजारीं, लोटा विहीरींत परंतु पडूं द्या अन्न खळगींत!

दीनदुबळ्या जनतेची आर्थिक दशा पाहून, अन्नान्न विवंचनेने भूईवर तडफडणारे त्यांचे आत्मे पाहून कवीच्या डोळ्यांत अश्रु उभे राहतात, त्याचें हृदय कळवळुन येतें आणि तो सांगतो—

दुधाविना अन्नाविना मेलेल्या बाळांनो,
खुला डोळां बघणाऱ्या कंकाल आयांनो,
रस्तोरस्तीं मरणाऱ्या दुर्दैवीं जीवांनो,
खोल जखम हो केली प्राण देणाऱ्यांनो—
प्राण तुम्ही दिले, आम्ही चैतन्य पावलों
अश्रु तुम्ही दिले, आम्ही आग्नेय जाहलों
आम्ही खोल–खोल तुमच्या प्राणांत बुडालों
अगाधता पाहूनीया स्तंभितसे झालों

आणि मग कवि ह्या मृत्प्राय झालेल्या जनतेला धीराचा दिलासा देतो.

आकांत कां मांडता हो माझे पंचप्राण,
सशक्त व्हा, पाय रोवा, उद्याचीच आण
पालटेल कुणी विश्व–इतिहास पान
जीवनाची जय बोला! उंचवा निशाण!!

समाजांतील खालच्या थराला हा जो चैतन्यपूर्ण, ओजस्वी आदेश कवीने दिला तो क्वचितच कवींनी दिला असेल! ह्या दुर्दैवी पददलित जनतेच्या अंतरंगांत शिरून त्यांचीं दुःखें वेशीवर टांगण्याचा मोटेपणा क्वचितच कवींनी दाखविला असेल! म्हणूनच मुक्तिबोधांचें काव्य 'अमर काव्य' वाटतें. कवीला

आपली शक्ति, आपली सहृदयता आणि आपलें जीवन यांची जाणीव आहे. इतर साहित्यिक कागदावर उरफाट्या रेघोट्या ओढण्यापलीकडे तरी प्रात्यक्षिक स्वरूपांत काय करतात हें लक्षांत घेऊन आणि स्वतःला त्याच पंक्तींत ठेवून तो ' गंभीर झडेत गगन-दुंदुभि ' ह्या कवितेंत सांगतो—

केवळ पुस्तकी क्रांतीचे आम्ही—
यांत्रिक गीतांचे कागदी कवी
त्रयस्थ राहून दुरून तोपू
रचून कविता महाविप्लवी

आणि पुढे माणुसकी, दारिद्र्य यांचें भेसूर चित्र कवि रेखाटतो—

माणुसकी झिजून झिजून मरते
क्षयाने झिजल्या दारिद्र्यासमान
सौंदर्य जळून कुरूप बनते
देवींनी डागल्या चेहऱ्यासमान !
प्रेताच्या समान जळके सांगाडे
मातीचीं खापरं पुढ्यांत घेऊनी
"अन्न द्या ! अन्न द्या ! करिती आक्रोश
डोळ्यांच्या खाचांत प्राणास कोंडूनी !

श्री. मुक्तिबोध यांची कविता इतकी दाहक आहे, इतकी ज्वलंत आहे आणि म्हणूनच ती उपकारी आहे !

प्रस्तुत काव्य-संग्रहाच्या कवीला खरोखरी काय हवें ? त्याला भद्राळुपणा नको कारण त्याला कर्तव्यनिष्ठा हवी; त्याला विषमतेची भयंकर चीड आहे कारण त्याला समता हवी; त्याला युक्तिवादाची शिसारी येते कारण त्याला सहानुभूति हवी; त्याला वरपगी देखावा नको कारण त्याला माणुसकीची रीत हवी; कलुषीने केला जाणारा व्यवहार त्याला नको कारण त्याला सरलता हवी; त्याला पैसा फेकून देऊन दातृत्वयान म्हणून मिरवून घेणारा नको कारण त्याला सहृदयताच हवी. असे अनेक उत्कट, सोज्वळ, उच्च विचार अथपासून इतिपर्यंत त्यांच्या काव्य-मालेंत अनस्यूत झालेले आहेत. इतक्या परिपूर्णतेने सजलेला मुक्तिबोधांचा ' नवी मळवाट ' हा काव्य-संग्रह १९४९-५० मधील उत्कृष्ट काव्य-संग्रहांत पहिल्या प्रतीचाच आहे असें नव्हे तर महाराष्ट्राला ही एक मोलाची देणगीच आहे !

दांडगा व्यासंग, सखोल विचारशक्ति, अनुभूतिपूर्ण प्रवृत्ति आणि गंभीर ह्या गुणसमुच्चयामुळे हा काव्य-संग्रह 'नव काव्या'च्या आमच्या कसोटीला उतरला आहे. शेवाळ चढलेली जीवनाची जुनी मळवाट नव विचारांनी पांत निर्माण करून ह्या नवीन वाटेवरून अंधारांत चांचपडत असलेला समाज, यंत्रयुगामुळे पाय ओढले जात असतांहि धडपडत-अंग झिडकारून

प्र्र सोफा सवाई नाही,

गुलामीची धूळ झाडीत, नवचैतन्याने प्रेरित होऊन जीवनाचें जेथे साफल्य साधेतें अशा सूर्ययुगाकडे वेगाने पुढे पुढेच जाऊं पाहात आहे असल्या मार्मिक, सूचक मुखपृष्ठावरूच काव्य संग्रहाच्या अंतरंगाची पुरेपूर कल्पना येते. या कल्पनेला "आजचें वास्तव्य, आजच्या वास्तव्याच्या गर्भातील समतेच्या जीवनाचें उद्याचें वास्तव ही नवकवितेची आधारशिळा होय...पुरोगामी मराठी नवकाव्य हें अनैसर्गिक अमानवी जीवनाचा फक्त नाशच करूं इच्छित नाही तर नवें जग घडवूं इच्छितें. साऱ्या पीडित मानवजातीसंबंधी खरीखुरी गंभीर सहानुभूति नवकवितेचा आधार आहे." कवीच्या प्रस्तावनेंतील अशा नवविचारांची साथ मिळून संग्रहांतील नवकाव्याचें सत्यस्वरूप प्रगट होत जातें. इतक्या सुसंबद्ध अर्थपूर्ण चेतोहारि अशा 'नवी मळवाट' ह्या काव्य-संग्रहाचा जन्मदाता कवी आणि तो जनतेपुढे ठेवणारा प्रकाशक तथा चित्रकार धन्यवादास पात्र आहेत.

काव्य-संग्रहः 'नवी मळवाट', कवि शरच्चंद्र मुक्तिबोध, प्रकाशकः ब. गो. गर्गे, एम्. ए., वीणा प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर; मूल्य २॥ रु.

शिराळ शेट

★

बहामनी राज्यांत शिराळशेट नांवाचा एक वाणी सावकार राहत होता. दुर्गा देवीचा मोठा दुष्काळ पडला असतां त्याने आपल्याजवळील धान्य वगैरे देऊन पुष्कळांचे प्राण वाचविले. त्यामुळे बहामनी राजाची मर्जी शिराळशेटवर प्रसन्न झाली; आणि त्याने शिराळशेटला काय देणगी देऊं अशी विचारणा केली. शिराळशेट म्हणाला—'मला ३॥ घटका तुझ्या राज्याचा धनी कर'. राजाने त्याला साडेतीन घटका राज्य देण्याचें कबूल करून आपली राजमुद्रा त्याच्या स्वाधीन केली. शिराळशेटने त्या अवधींत बऱ्याच धार्मिक संस्थांना व देवालयां मोठाल्या देणग्यांच्या सनदा राजाच्या मुद्रेसह तयार करून दिल्या. स्वतःसाठी कांही एक देणगी घेतली नाही. साडेतीन घटका भरतांच त्याने मूळ राजाच्या स्वाधीन मुद्रा व राज्यपद केलें. राजाने शिराळशेटाचें औदार्य पाहून त्याची खूपच प्रशंसा केली.

या औट घटकेच्या राजाची आठवण लोकांना दीर्घकाल दरवर्षी श्रावण वद्य षष्ठीस शिराळशेटीच्या प्रतिमेची स्थापना करून तिची पूजा करण्यांत येत असेत.

नादलुब्धाच्या स्मृतिलहरी— ६

भीमसेन जोशी

मधुकर श्रीधर मंगरूळकर

★

'काय हो ! माझे ओठ अजूनहि लाल दिसतात कां ?" श्री. भीमसेन जोशी यांचा हा प्रश्न ऐकून मला क्षणभर आश्चर्य वाटलें. महालांत, श्रीमंत बाबूराव देशमुख यांच्या वाड्यासमोर हा प्रसंग घडला. आम्ही नुकतेच फिरून परत आलों होतों. वर जाण्यापूर्वी श्री. जोशी यांनी आपल्या शर्टातून रुमाल काढून ओठ जोरजोराने घासत, मला प्रश्न केला. वर जाणें आणि त्यांचे ओठ विडा खाऊन रंगलेले असणें यात वावगें असें कांहीच नव्हतें. हातांतला रुमाल, डाव्या हातांतील पिशवींत टाकून ते म्हणाले,

'—गुरुजी आहेत वर ! त्यांच्यासमोर मी विडा खाऊन जात नसतों. सुपारीदेखील त्यांच्यासमोर कध्धी खात नाही. लहर आली तर ही पिशवी घेऊन तुमच्यासारख्याला भेटायला जायचें आहे असें सांगून बाहेर पडतों. बघा ! यांत अडकित्ता, सुपारी सारें कांही आहे. पण गुरुजसिमोर...'

श्री. भीमसेन जोशी यावेळीं आपले गुरुजी श्री. रामभाऊ कुंदगोळकर उर्फ सवाई गंधर्व यांना घेऊन नागपुराला आले होते. वर वाड्यांत त्यांचा मुक्काम होता. पक्षघाताच्या आजाराने सवाई गंधर्व परावलंबी झाले होते. त्यामुळे आपल्या शिष्योत्तमाला ते कधीहि विसंबत नसत. श्री. भीमसेन देखील त्यांची सेवा तितकीच मनोभावाने करतात हें या लहानशा प्रसंगाने माझ्या तावडतोब लक्षांत आलें. त्यांच्या मार्फतच सवाई गंधर्वांची माझी ओळख झाली. सवाई गंधर्वांचें गाणें नाही तर निदान त्यांच्या रसाळ आठवणी ऐकाव्या म्हणून त्या काळांत अनेक वेळां मी रामभाऊंना भेटलों असेन आणि प्रत्येक वेळी श्री. भीमसेन आपल्या गुरुजींच्या पायाशी बसलेले मला आढळायचे. श्रीमंत बाबूरावांच्या खास दिवाणखान्यांत रामभाऊंची खास व्यवस्था झालेली. कोचेस आणि सोफा सेटस् याशिवाय जिथे दुसरी खुर्ची दिसायची नाही, अशा दिवाणखान्यांत सवाई गंधर्वासमोर मी भीमसेनांना कधीहि उच्चासनावर बसलेलें पाहिलें नाही.

रामभाऊ त्यांचे गुरु आहेत म्हणून ते त्यांना एवढा मान देतात हें तर ओघाने आलेंच पण श्री. भीमसेन जोशांना त्यांचा मोठेपणा पटला त्याला कारणेंहि अनेक आहेत. सर्व हिंदुस्थान आपल्या संगीत-शौकासाठी पालथा घातल्यानंतर, त्यांना सवाई गंधर्वांच्या ठिकाणींच सागराची गंभीरता, सखोलता व व्यापकता दिसून आली व या व्यक्तीहून आता संगीत क्षेत्रांत सर्व तुच्छ आहेत अशी त्यांची खात्री झाली तेव्हाच त्यांनी सवाई गंधर्वांचा गंडा बांधला. आणि तो देखील अगदी अलीकडे...

संगीताची आवड श्री. भीमसेन यांच्या अंगीं स्वयंभूच आहे असें म्हटलें तरी हरकत नाही. त्यांचे वडील शिक्षक होते. इतिहास-भूगोल-गणीत यासारखे रुक्ष विषय शिकविणाऱ्यामध्ये संगीताचे मंजुळ झरे सापडणें जवळ जवळ अशक्यच! आईने भजनें म्हणावीं व तीं कानावर पडत असतांना लहानग्या भीमसेनावर जे कांही संगीत संस्कार झाले असतील तेवढेच! बँडवाल्यांच्या 'टब्बटब्ब' या तालबद्ध आवाजाचेंहि त्यांना लहानपणीं जबरदस्त आकर्षण असे. त्यांच्या मागे लागून आपला मुलगा उगाच हरवून जाऊं नये म्हणून वडिलांनी त्यांच्या गळ्यांत नांव व पत्ता लिहिलेली चिठ्ठी अडकवून ठेवली होती...

संगीत शिक्षणाला अर्थातच वडिलाकडून दुजोरा मिळणें शक्य नव्हतें. आईच्या कुशींत घुसण्याने त्यांचा कार्यभाग साधला. गांवांतच एक छन्नाप्पा नांवाचे गवई होते! त्यांच्याकडे प्राथमिक धड्यांना सुरवात झाली. वयाचें एक तप पुरें झालेलें पण शिक्षणांत लक्ष नाही—गायकाचा धंदा करणें पसंत नसलेल्या, त्यांच्या वडिलांना भीमसेनाचे रागरंग ठीक वाटले नाहीत. त्यांनी खूप तोंड-सुख घेतलें, संगीताचा मोह आणि पित्याची इच्छा, या दोन गोष्टींचें द्वंद्व सुरू झालें आणि एक दिवस ही वामनमूर्ति घरदार सोडून आगगाडींत जाऊन बसली. तिकिट मागणारा आला म्हणजे कसें बसें स्टेशनवर उतरून ती वेळ टाळावी. अखेर ग्वाल्हेर स्टेशन आलें. ग्वाल्हेर! हिंदी संगीताचें माहेरघर! तिथे त्यांनी चार पांच महिने कसेबसे काढले आणि दुसरा मुक्काम जालंदरला केला. आर्य संगीत विद्यालयांत दोन वर्षेपर्यंत फुकट शिकण्याची व्यवस्था झाली. गळा जरा फिरूं लागला. घरची—आई वडिलांची आठवण आली. दोन अडीच वर्षांनंतर पहिलें पत्र जालंदरच्या पोस्टाच्या लाल पेटींत पडलें. त्या पत्राला त्यांच्या वडिलांनी अश्रूंनी न्हाऊं घातलें असेल. आपल्या रागावरून, न सांगतां आपला मुलगा रागसाधन करण्यासाठी घरांतून निघून गेला...त्याचें दोन अडीच वर्षांत कांहीहि कळलेलें नाही...अशा स्थितींत जालंदरहून आलेल्या त्या पत्राने घरांत किती आनंदाचें वातावरण निर्माण झालें असेल! वडिलांच्या आग्रहाच्या आमंत्रणाहून भीमसेन आपल्या माहेरी परत आले. वडिलांनी त्यांचें गुणगुणणें ऐकलें असावें; कारण गाणें ऐकणें म्हणजे आपल्या वडिलकीचा पराभव झाला असें कबूल करणें असें त्यांना वाटलें की काय कोण जाणे. गदग येथे राहणाऱ्या श्री. विष्णुपंत महाशब्दे या आपल्या मित्राकडे भीमसेनाला ते एक दिवस घेऊन गेले व

म्हणाले "पाहा विष्णुपंत, हे माझें पोर वाया जाणार हें तर दिसतेंच आहे. नको शिकूं म्हटलें तर घर सोडून पुन्हा केव्हा पळेल याचा नियम नाही. रामभाऊंची तुमची ओळख आहे. विचारून बघा त्यांना याच्याबद्दल..."

तें साल होतें १९३५! रामभाऊ सवाई गंधर्वांनी त्यांचा आवाज ऐकला. चांदीच्या रुपयांच्या चळती एका हातांतून दुसऱ्या हातांत ओतीत असतांना, बँकेचा कॅशिअर, सराईतपणामुळे चटकन वाईट नाणें उचलून वेगळें टाकतो. खऱ्या धातूचा आवाज त्यांच्या कानाला परिचित असतो. सवाई गंधर्वांना त्यांच्या आवाजांत विशेष गोष्ट दिसली. त्या दिवसापासून पुन्हा प्राथमिक धडे सुरू झाले. मुलुखगिरीमुळे गळ्यावर वाईट संस्कार झाले होते. ते पुसून काढून नवीन संस्कार घडविण्यापूर्वी गळा स्वच्छ करण्यास रामभाऊंना कितीतरी मेहनत पडली. परंतु आपलें नांव आपल्या पश्चात चालविण्यास योग्य असा हा पोरगा होईल ही भविष्यवाणी त्यांच्या मनांत बिंबल्यामुळे त्यांनीहि विद्यादानांत कधीहि कसूर केली नाही. 'मिया मल्हार' रागाची तालीम सुरू असताना शुद्ध निषाद व कोमल निषाद या दोन्ही निषादांचा प्रयोग रागहानी न होऊं देतां कसा करावा हें रामभाऊ सांगत होते. वास्तविक 'कानडा' व 'मल्हार' या दोन रागांच्या मिश्रणाने हा राग तयार झालेला. दोन्ही निषाद एकमेकाला टेकून बसलेले—त्यांना नीट सांभाळून प्रवास करणें कठीणच. विशेषतः विद्यार्थ्यांच्या संस्कारहीन गळ्याला तर ती कसरत विशेषच कठीण. भीमसेनाचा एक स्वर कुठे जरा कणसुरा लागला. रामभाऊ पान खात होते. त्यांनी रागावून ताडकन् हातातला आडकित्ता फेकून मारला. संतप्त मूर्तीच्या पदप्रहाराचें लांच्छन! गुरुप्रेमाची ती खूण अजून भीमसेनाच्या डाव्या डोळ्याखाली आहे. म्हणूनच की काय भीमसेनाचा 'मिया मल्हार' हा एक आवडता आणि हातखंडा राग आहे. 'करी ऽऽम नाऽऽम तो ऽऽ रे' असें तोंड घेतलें की त्यांची बैठक रंगायला जी सुरवात होते तिच्या मागे हा इतिहास आहे.

रामभाऊंकडे कांही दिवस शिक्षण घेतल्यानंतर ठुंबरी गायकीचें शिक्षण घेण्यासाठी ते कांही दिवस लखनौ येथे राहिले. काही दिवस बनारस येथे रामपूर स्टेटचे दरबार गायक खाँ साहेब मुश्ताक हुसेन यांच्याकडे त्यांनी साधारणपणे दीड वर्षे रियाज् केली. खडकपूर येथे श्री. केशव मुकुंद लुखे यांच्याकडे एक वर्ष काढलें कलकत्याला विश्वदेव चॅटर्जी या प्रसिद्ध गायकाकडे कांही दिवस काढले. हे गायक पुढे संन्यस्त वृत्तींत पॉंडेचरी येथे वास्तव्य करण्यास गेले. या सर्व गायकांपासून निरनिराळ्या बंदेशीच्या चिजा त्यांनी घेतल्या व १९३९ मध्ये पुन्हा रामभाऊंपाशी शागिर्दी सुरु केली ती आजतागायत चालू आहे. रामभाऊंचा अधिकृत गंडा हुबळी येथे बांधण्याचा मोठा समारंभ झाला. एक हजार रुपये गुरु दक्षिणा दिली गेली आणि जणूं त्या दिवशीपासून रामभाऊंचा वरदहस्त त्यांना मिळाला. इतक्या प्रकारच्या गायकांपासून गायकी मिळविली असली तरी

रामभाऊचें शिक्षण सुरू झाल्यावर त्या सार्‍या प्रकारांचा जणूं लोप झाला. चांदण्याच्या प्रकाशांत कडुलिंबाच्या फुलांचा वास गोड येत असतो पण एकदा रातराणी फुलली म्हणजे त्या वासाचा कुठल्या कुठे पत्ता लागत नाही त्याप्रमाणे भीमसेनचें झालें. रामभाऊंची गायकी अशी जबरदस्त की त्यांनी आपली छाप ठेवतांच इतर सगळ्या प्रकारांचा पार लोप होऊन गेला. पाण्याने भरलेल्या भांड्याला जरासा धक्का लागतांच हजारों लहान लहान कंपनें उठावींत त्याप्रमाणे या घराण्याच्या स्वरविस्ताराच्या वैशिष्ट्याबद्दल म्हणता येईल. रामभाऊंचे गुरु खाँ साहेब मरहूम अब्दुल करीम खाँ साहेब यांचें गाणें घ्या, रामभाऊचें घ्या किंवा भीमसेनचें गाणें घ्या, सार्‍याची कला सारखीच ! चीजेचे शब्द रागालापाच्या लाटेवर किती वेळ मागेपुढे डोलत आपलें सौष्टव व्यक्त करतात हें पाहाण्यासारखें असतें. भावगीताचे शब्द संपताच गाणें संपविणार्‍या गायकांना माझ्या या मताचें महत्त्व पटेल. रागज्ञानाची अखंड माहिती, गळ्यांतील स्वरांची किमया व तालाशी मिळून केलेला तास दीड तासाचा हा संगीत प्रवास हा नाद ब्रह्माची आठवण देणारा असतो हें कुणीहि कबूल करील. भीमसेन जोशी यांच्या बैठकी ऐकून मला हा नादब्रह्माचा आनंद अनेक वेळां लुटतां आला आहे.

१९४१ पासून श्री. भीमसेन जोशी मुंबई रेडिओ वरून गाऊं लागले होते. तेव्हा पासूनच त्यांच्या नांवाचा दबदबा निर्माण होऊं लागला होता. रामभाऊ सवाई गंधर्वांच्या षष्ट्यब्धिपूर्ति निमित्त पुण्याला हिराबागेत एक जलसा झाला होता. प्रो. सुरेशबाबू माने, सौ. हिराबाई बडोदेकर, मास्तर कृष्णराव, बापूराव केतकर वगैरे कलावंतांनी रामभाऊंच्या सन्मानार्थ आपापली हजेरी लावली होती. यावेळी श्री. भीमसेन जोशी गायिले. त्यांनी म्हटलेला ' मिया मल्हार ' व ' चंद्रिका ही जणुं...' अजून पुणेकरांच्या आठवणींत असतील. त्याच कार्यक्रमाने त्यांच्या कीर्तीची चंद्रिका संगीत जगतांत पसरूं लागली आणि संगीत चकोरांची तहान तें चांदणें पिऊन शांत झाली.

श्री. भीमसेन जोशी अडीच तीन वर्षांपूर्वी प्रथम नागपूरांत आले. श्री. नगरकट्टींच्याकडे त्यांचा मुक्काम होता. सवाई गंधर्वाचे पट्टशिष्य म्हणून सारा संगीत-महाराष्ट्र त्यांना ओळखीत होता. सवाई गंधर्वांना नागपूरात जर कुणी प्रिय असेल तर ते म्हणजे श्रीमंत बाबूराव देशमुख. आपल्याला नाट्य-व्यवसायांतून बाहेर काढून जर गायक या प्रतिष्ठित पदवीस कुणी बसविलें असेल तर ते श्रीमंत बाबूरावांनी, हें श्री. सवाई गंधर्वांना माहीत होतें. आपला पट्टशिष्य नागपूरला जातो आहे मग बाबूरावांना न भेटतां तो परत येईल हें कसें होईल ? गुरुजींचा भीमसेनला आदेश मिळाला होता. एक दिवस नगरकट्टींच्या घरून बाबूरावांच्या घरचा टेलिफोन खणाणला. आपल्या मित्राचा पट्टशिष्य नागपूरला आला आहे ही बातमी त्या यंत्राने सांगितली. दुसरे दिवशीं एक मोठी लिंकन-फोर्ड नगरकट्टींच्या दाराशी येऊन उभी राहिली; आणि सामानासहवर्तमान

श्री. जोशी यांना महालांतील राज दरबारीं घेऊन आली. श्री. भीमसेन जोशी बाबूरावांच्याकडे मुक्कामाला आले. जणू सवाई गंधर्वांनी आपली मूर्तिमंत साकार गायकीच त्यांच्याकडे पाठविली होती. रामभाऊंच्या गाण्याची जर कार्बन-कॉपी मला ऐकायला मिळाली असेल तर ती प्रथम त्या मुक्कामांत...!

' त्यांनी गायलेल्या शुद्ध कल्याणाचे सूर अजूनहि माझ्या कानांत घुमत आहेत. कलावंतांच्या हातून एखादीच कृति अक्षर निर्माण होऊन जाते. ताजमहाल एकदाच निर्माण होतो. तेंच तत्त्व संगीतालाहि देखील लागू करता येईल. एक दीड तपापूर्वी चतुर संगीत महाविद्यालयाच्या दिवाणखान्यांत रामभाऊ सवाई-गंधर्वांनी गाइलेली ' लगत कलजुवा पे चोट—' ही भैरवी पुन्हा तशी कधी रंगली नाही तव्येतीची गोष्ट आहे ती ! सुगृहिणी रोज स्वयंपाक करते पण एखादे दिवशीं पाकसिद्धीत अमृत-योग जमून जातो त्याप्रमाणे ही सिद्धि आहे. भीमसेनांनी त्या बैठकींत म्हटलेला शुद्ध कल्याण देखील याच मालिकेंतला—

' येरी मा ऽ ऽ ई पिऽ ऽया ऽ ऽ—' ' पि ऽ ऽ या ' तील 'पि' या शब्दावर आघात करून शुद्ध ऋषभावर घेतलेला जोरदार सम आजहि माझ्या कानांत निनादतो आहे. मध्यसप्तकाचा गांधार, फार तर पंचम —पुन्हा तीव्र मध्यमाच्या मींडेने षड्जाला मिळून ऋषभावर ' पि ऽ ऽ या ' म्हणून त्यांनी सम घ्यावी...हें सांगून नुसती पुसटहि कल्पना यावयाची नाही. स्वरलेखन करूनहि ती गायकी कानासमोर उभी करता यायची नाही. शारदीय चंद्राची सुषमा ती न पाहिलेल्याला वर्णन कशी करून सांगता येईल? खर्ज भरण्याची त्यांची हातोटी त्यांच्या गुरुजीसारखीच विलक्षण आहे. अत्यंत खालच्या स्वरांत देखील त्यांचा आवाज किती स्वच्छ आणि रुंद लागतो. मेहनत करून ज्याप्रमाणे स्कंध पुष्ठ आणि दीर्घ होतात त्याप्रमाणे स्वरसाधना करून त्यांनी दमसासपणा वाढविला आहे. एका मोठ्या पितळेच्या भांड्यात तोंड घालून हुंकार घालावा म्हणजे जसा क्षणभर गंभीर नाद होतो किंवा देवळाच्या आंतल्या गाभाऱ्यांत जाऊन ' हरहर शंभो—' म्हणताच ' शंभो ऽ ऽ—' या शब्दाचा नाद घुमत रहावा त्याप्रमाणे भीमसेन यांच्या खर्जाचें आहे. 'माझें शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पूर्ण एक वर्ष-पर्यंत रोज रात्रौ १० ते पहाटें ४ वाजेपर्यंत खर्जाची मेहनत मी करीत असे—' असे भीमसेननी मला सांगताच मला आश्चर्य वाटलें नाही. कारण अशा अचाट मेहनती शिवाय ही जादु साधणें शक्य नाही याची मला पूर्ण कल्पना होती. कलेशी सचेपणा असल्यानंतर, ती तात्रेदारासारखी अष्टौप्रहर हात जोडून उभी राहणार नाही असें कसें होईल ? आरोहांत पांच स्वर आणि अवरोहात सप्तसुर घेणाऱ्या याच रागांत त्यांचा दीड दोन तास अखंड संचार पाहिला म्हणजे सतत तपाने येणाऱ्या सामर्थ्याची कल्पना येते. 'खो खो'च्या खेळांत अघला मघला गडी सोडून, भलताच गडी बाद करावा त्याप्रमाणे तबलजीला हुलकावणी देऊन जेव्हा ते समेवर येऊन ' पि ऽ ऽ या ' म्हणत तेव्हा वीज चमकल्यासारखें वाटे. नागपूरांत अलिकडे कित्येक वर्षांत ज्या कांही उत्कृष्ट मैफिली झाल्या अस-

तील, त्या सर्वांत चिरकाल आठवण होण्याजोगी झाली असेल तर ती म्हणजे ललित कला मंडळात श्री. भीमसेन जोशी यांची गेल्या चार जानेवारीला झालेली बैठक.! 'अप्रतिम' या शब्दापलीकडे वर्णन करायला माझेजवळ शब्द नाहीत. ती बैठक नागपूरच्या ज्या रसिकाने चुकविली असेल त्याच्या सारखा दुर्भागी नाही असेंच मी म्हणेन. त्या बैठकीच्या असामान्यतेमागे इतिहास होता आणि तो सर्वांना ठाऊक असणें शक्य नाही.

१७ डिसेंबर १९४९ रोजी मंडळाचें उद्घाटन श्री. निवृत्तिबोवा सरनाईक यांच्या गायनाने झालें होतें. योगाची गोष्ट अशी की आशिर्वाद द्यावयाचे निमित्ताने जणूं त्या दिवशीच पुण्याहून सवाई गंधर्व व श्री. भीमसेन जोशी नागपूरांत आले होते. तेहि त्या बैठकीस हजर होते. श्रीमंत बाबूरावजी देशमुखांच्या आश्रयाखाली नुकत्याच स्थापन झालेल्या त्या मंडळाचा त्या दिवशींचा थाट कांही औरच होता. बुवांनी मारु-बिहागांतील 'रसिया हूं नाजा—' ही प्रसिद्ध चीज सुरू केली होती. खाँसाहेब अल्लादियाखाँच्या घराण्यांतील अस्सल चक्राकार तानांची गायकी सुरू झाली होती. सवाई गंधर्व आजारी असून सुद्धा रात्रौ २॥ पर्यंत बसले होते. श्री. भीमसेन जोशींच्या आगमनाने पुढचा कार्यक्रम त्यांचा व्हायचा हें जणूं सगळ्यांना त्या दिवशींच ज्ञात झालें होतें.

दुसरे दिवशीं सवाई गंधर्व भीमसेनला म्हणाले—

'भीमसेना! कालचा मारु-बिहाग ऐकलास ना?'

'हो गुरुजी!'

'मग आता पुढचा कार्यक्रम तुझा आहे मंडळांत—'

'हो गुरुजी!'

'मग! हाच राग गावून दाखवायचा तूं! समजलास! आणि हीच चीज तुझ्या घराण्यांत कशी गातात हें दाखव आम्हाला.'

'पण गुरुजी...'

'कायरे?'

'हा राग तुम्ही मला नीट शिकविला नाही.'

'अस्सं! मग काढ तंबोरा आताच.

'पण गुरुजी! तुमची तब्येत—'

'हीच वेळ आहे. मी काय आज आहे, उद्या नाही. मला इच्छा झाली आहे. घेऊन टाक जें मिळतें तें...पण गंगुबाईला सांगायचं नाही बरं का? काल कलकत्त्यावरून कॉन्फरन्सवरून परत जातांना नागपुराहून गेली असं मला कळलं. पण मला भेटायला थांबली नाही...इं! लाव सा ऽ'

अनुक्रमणिका

...आणि अशा रीतीनें गुरु-शिष्याची तालीम सुरू झाली. गायत्रीमंत्राचा जसा कानांत उच्चार करावा, त्याप्रमाणे गुरुजी हळूहळू कानांत 'रसिया हूं ना जा' चे पलटे सांगत आणि भीमसेन ते कंठगत करीत असे. बाबूरावजींच्या घरीं गुरु-शिष्य प्रेमाचे अनेक चमत्कार मला त्या मुक्कामांत दिसले. पण तो अलौकिक मारु-विहाग नागपूरच्या त्या मुक्कामांत ऐकावला मिळाला नाही. कारण दोन तीन दिवसांतच गुरुजींची तबियत जास्तच खराब होऊं लागली आणि भीमसेन त्या दिवशींच त्यांना पुण्याला पोचवून आले.

...पुण्याला सवाई-गंधर्वांनी त्यांना उपदेश केला...'नागपूरला विसरूं नकोस...! श्रीमंत बाबूरावांचे माझ्यावर अगणित उपकार आहेत. तुला मीं जें कांही दिलें तें द्यायला देखील अप्रत्यक्षरीत्या तेच कारणीभूत आहेत. नाटक-कंपनी सोडायला लावून, मिळो नोटिस मिळताक्षणींच बाबूरावांनी मला बोलावून घेतलं... मला महाराष्ट्र गायक म्हणून ओळखूं लागला. कारवार माझी लाक्षणिक अर्थानें जन्मभूमि असली तरी माझा लौकिक-जन्म नागपूरांतच झाला...जा ! नागपूरला जा ! आणि बैठक मारून विजयी होऊन ये...!'

हें आशिर्वादाचें ओझें घेऊन ते परत नागपुरला आले होते आणि अशा पार्श्वभूमींत ती ४ जानेवारीची बैठक रंगणार नाही असं कसं होईल ? 'हातखंडा शुद्ध कल्याणां'तील 'मोंदर बाजे' 'पुरिया' मधील 'पिया गुणवंता—' मियामल्लारांतील 'करीम नाम तोरे'—सर्वच मोती उत्कृष्ठ असल्यावर माझ्या सारख्या सर्व साधारण माणसाची, त्यांची वर्गवारी लावताना त्रेधा न उडाली तरच नवल. बैटकीच्या पूर्वांगांतील 'मोंदर बाजे' श्रेष्ठ की, उत्तरांगांतील 'करीम नाम' श्रेष्ठ ! पूर्ण बनारसी ढंगाने म्हटलेली 'ऐसो ना मारो पिचकारी' ही ठुंबरी अधिक गोड की 'चंद्रिका ही जणूं—!' श्रोत्यांना सांगणं अशक्य झालं. असीम सुखाची परमावधी झाली म्हणजे जसे डोळ्यात आंसू उभे राहतात त्या-सारखी गत झाली. सुरेलपणाची—अतिशय मधुरपणाची कमाल झाली म्हणजे हि अंगावर रोमांच उभे राहतात. तें अलौकिक सुख मी त्या बैटकींत अनुभवलें आहे. पहिल्याच गाण्याला श्रीमंत बाबूरावजी आपली गादी-तक्याची बैठक सोडून पुढे येऊन बसले, डोळे लावून ध्यानमग्न बसले. रामभाऊ नाटक कंपनी सोडून नुकतेच आले आहेत आणि त्यांचीच बैटक जणूं चाललेली आहे असें त्यांच्या मुखावर भान होतें. 'चंद्रिका ही जणूं' या पदाने तर कमालच करून दिली—'चंद्रिकाऽ' म्हणावें आणि भरभर चांदण्याची माळ गळून पडावी असें वाटे 'चंद्रिका...' या शद्बाची इतक्या प्रकारचीं पकारें मी पूर्वी पाहिलीं नव्हतीं. उत्कृष्ठ ! अति उत्कृष्ठ !!—आणि भैरवीने तर कमाल करून दिली—"बोली ना ऽ बोल—" म्हणतांच रुसलेल्या विरहिणीची मूर्ति अक्षरशः डोळ्यासमोर उभी राहिली—माझा पिया माझ्याशी बोलत नाही—रात्रभर डोळ्याला डोळा लागत नाही—'हमसे पिया संग—औरन रैन जात—बोली ऽऽ ना ऽऽ बोल—ठुंबरी वजा

त्या भैरवीने श्रोत्यांना अक्षरशः वेड लावलें होतें. श्री. बाळासाहेब आठवल्यांच्या 'लग्गा' चालू होत्या. प्रभाकरराव जोशी हार्मोनियमवर कमाल करीत होते--आणि या तिघांच्या मिश्र करामतींने ' बोली ना ऽ बोल' या ओळी श्रोत्यांची अंतःकरणें विव्हल करीत होत्या. त्यांचें गाणें संपलें. सगळे जणू हतप्रभ झाले होते. कानाशिवाय जणु सर्व अवयव अंतर्धान पावले होते. या सान्या प्रसंगावर आणखी एका लहानशा प्रसंगाने कडी केली. त्यांनी लहानसें भाषण केलें. आपल्या गुरुजींच्या अंतःकरणांतील तळमळ बोलून दाखविली. आपल्या गुरुजींच्या नागपूरकरांच्या प्रेमाचे अल्पांशाने उतराई म्हणून का होईना, त्यांनी त्या बैठकीची मिळणारी बिदागी, त्या मंडळाला देणगी म्हणून देऊन टाकली. बैठकीचा परमोच्च बिंदु तेव्हा गांठला गेला. कडाडून टाळी पडली, तेव्हा श्रोत्यांच्या मनांतील अबोल भाव सगळ्यांना कळले,

गाणें संपल्यावर ते म्हणाले,

"आज छाती फार दुखते आहे--"

"अरे! असा नेहमी गाशील तर छाती फोडून घेशील—"श्रीमंत बाबूराव म्हणाले.

"नेहमी मी इतका गात नसतों. गुरुजींची इच्छा होती आणि एकदा आपल्याला ऐकवायचं होतं—"

'मनहर गायन समाजां'तील भैरवी देखील त्याच थाटात रंगली होती. 'लगत कलजुवापे चोट—फुल गेंदवा न मारो राजा' रामभाऊंची ही हातखंडा भैरवी—भीमसेननी तितक्याच रसीलेपणाने रंगविली.

मियामल्हार, तोडी, पुरिया मुलतानी मारवा, शुद्ध कल्याण, दरबारी हे त्यांचे अत्यंत आवडते राग रेडिओवर गातांना देखील त्यांचें एक विशिष्ठ अवधान आहे. पण दहापंधरा मिनिटांच्या अल्प वेळांतहि खास रंग भरतां येईल अशा कितीतरी अनवट रागदारीच्या पण गोड बंदेशीच्या चीजा त्यांच्यापाशी आहेत. नागपूर रेडीओवरून गाइलेल्या काफी रागांतील 'प्रदीपिकी' प्रकारची त्यांनी म्हटलेली चीज ज्यांना आठवत असेल, त्यांना माझें म्हणणें पटेल. 'पिया नाहीं घर—कैसे धरूं धीरज—' रात्रीं १०। ते १०॥ पर्यंत त्यांनी म्हटलेली ती चीज रेडिओ बंद होऊन गेला तरी माझे डोक्यांत घोळत होती. यांच्यासारखा एखादा अग्रपेळू गायक पण अजून एकाहि संगीत कॉन्फरन्समध्ये गेला नाही याचें मला आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाही. '—मी गायल्यानंतर इतर कुणी रंग मारणार नाही अशी माझी खात्री होईपर्यंत मी कॉन्फरन्सला जाणार नाही' असें ते मला म्हणाले.

महाराष्ट्राला श्री. भीमसेन यांची ओळख उत्कृष्ट गायक म्हणून झाली असली तरी त्यांच्या दुसन्या गुणाविषयीं इकडे माहिती नाही. श्री. भीमसेन जोशी

हे कर्नाटकांतील एक उत्कृष्ट संगीत नट म्हणून ओळखल्या जातात. नागपूर नाट्य मंडळाच्या धर्तीवर त्यांनी ' कलोपासक मंडळ ' नांवाची हौशी कलावंतांची नाट्यशाळा काढली असून १०० नाटकांचा त्यांनी संकल्प सोडला आहे. 'भाग्यश्री' या नाटकांतील त्यांची 'प्रसन्न' ही नायकाची भूमिका व 'परिवर्तन' मधील 'विश्वंभर' ही भूमिका तिकडच्या लोकांना फार आवडली आहे. योगासनें करणें, पोहणें व स्लो-सायक्लिंग हे त्यांचे आवडीचे विषय असून अनेक प्राविण्य पदकें त्यांनी मिळविलीं आहेत. पण त्यांच्या गाण्यांनी त्यांना अजरामर केलें आहे. सवाई गंधर्व मोठ्या अभिमानाने म्हणतात,

' खरोखरच गाण्यांतला भीम आहे बरं हा—माझं गाणं आता याच्या तोंडून ऐका---'

--गुरुजींसमोर जातांना आपले ओठ लाल दिसूं नये म्हणून श्री. भीमसेन जोशी एवढी आटापीट कां करीत होते याचें मला आता आश्चर्य वाटत नाही !

भा र

मनोहर म. देशपांडे

☆

माझा मज भार
माझेंच मी ओझें
वाहे शिरावर !

क्लेश अनिवार
शब्दहि आंतला
फुटेना बाहेर !

हांसायाचें खोटें
आर्तते वांचून
रडायाचें खोटें !

दंभाचा पसारा
येथे देवघेव
बोल बोजवारा !

आव्हानाचा आव
जीवनाचा झाला
छंद आविर्भाव !

घालतों रिंगण
आपुल्या भोंवतीं
दुरावलें मन !

असेंच जगणें
आपुल्याच भारें
आपण वांकणें !

ध्येयवादी तुकारामबुवा

डॉ. शं. दा. पेंडसे

☆

पवित्र तें कुळ पावन तो देश। जेथे हरिचे दास जन्म घेती।।

भगवद्भक्त तुकाराम महाराजांची तीन शतकांतीं आलेली पुण्यतिथि महाराष्ट्राने नुकतीच साजरी केली. आधुनिक शिक्षण घेतलेले व न घेतलेले असे दोन्ही प्रकारचे लोक तुकारामबुवांकडे आकृष्ट झालेले दिसले. यांपैकी ज्या लोकांची इच्छा तुकारामबुवांना आपल्या व्यावहारिक उत्कर्षाच्या गाड्याला जुंपण्याची असेल त्यांची निराशा होईल. आम्ही व्यवहार-कुशल लोक साधुसंतांनाहि आमच्या व्यवहाराकरितां राबविण्याच्या प्रयत्नांत असतों. आणि साधुसंताचें सर्व लक्ष तर आध्यात्मिक उत्कर्षाकडे लागलेलें असतें. त्यामुळे त्यांचें आमचें फारसें कधीच बनत नाही. त्यांचीं आमचीं जीवनमूल्येंच भिन्न असतात. पोट आणि प्रतिष्ठा यांच्यामागे लागून व्यवहाराच्या चिखलांत आकंठ रुतलेले किंवा त्यांतच लोळण्यांत मोठेपणा आहे असें मानणारे लोक आणि व्यावहारिक उत्कर्षाकडे निग्रहाने पाठ फिरवून, विश्वव्यापी विश्वंभराच्या शोधाकरितां आणि अनुभवाकरितां जीवनाचा यज्ञ करणारे साधुसंत यांचें जमावें कसें ? संसारावर पाणी सोडून, ध्येयाच्या मागे लागल्यामुळे व्यवहारी लोकांनी वेडे ठरविलेले तुकोबा हे महाराष्ट्रांतील एक महापुरुष होत.

त्यांच्या काळीं वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण-क्षत्रिय कुळांत ते जन्मले नव्हते. अगदी सामान्य वैश्य कुणबी समाजांत ते जन्मले आणि आपल्या कर्तृत्वाने असामान्य झाले. सामान्य संसारी माणसाप्रमाणे त्यांच्यावर सर्व सांसारिक आपत्ति आल्या. दुष्काळामुळे आणि रोगराईमुळे त्यांची प्रथम पत्नी आणि घरांतील अनेक माणसें मृत्युमुखीं पडून त्यांचा संसार उजाड झाला. साध्याभोळ्या वृत्तीमुळे त्यांचा व्यापार बसला. या आपत्तीमुळे सामान्य मनुष्य खचून जाता पण तुकारामबुवांनी या आपत्तीमुळेच, विश्वाचें नियमन करणारी एखादी शक्ति आहे कीं नाही व असल्यास ती दयाळु आहे की दुष्ट आहे, जवळ आहे की दूर आहे याचा शोध करण्याचें ठरविलें. निसर्गातील निष्ठुरता आणि संसारांतील आपत्ति पाहून ते नास्तिक बनले असते तर त्यांना दोष देतां आला नसता; पण तसे ते बनले नाहीत. ज्या जुन्या लोकांना, विश्वनियंत्याचा अनुभव

आला होता त्यांचे ग्रंथ वाचून, मनन-चिंतन करून, त्यांत सांगितलेले मार्ग चोखाळण्याचा निग्रहाने प्रयत्न ते करूं लागले. देव भेटना तेव्हा फसविल्याबद्दल त्याला त्यांनी टाकून बोलण्यासहि कमी केलें नाही. पण संतवचनावर अढळ विश्वास ठेवून त्यांनी सांगितलेल्या मार्गाने गेल्यावर त्यांना जेव्हा ईश्वराचा साक्षात्कार झाला, त्यांच्या हृदयांतच त्यांना जेव्हा तो सांपडला तेव्हा त्यांना परमानंद झाला. सृष्टीचें आणि जीवनाचें कोडें त्यांना उलगडलें आणि 'अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तिन्ही लोक ॥' असा आत्म-विश्वास त्यांना वाटूं लागला.

तुकोबांप्रमाणेच सांसारिक आपत्तींनी त्रस्त झालेल्या कोट्यवधि सामान्य लोकांना तुकोबांचे शुद्ध हृदयाचे बोल सुखवितात व शांति देतात. संसार आणि व्यवहार यांचा उत्कर्ष साधण्याकरितां ज्या अनेक खटपटी व लटपटी कराव्या लागतात त्या ज्यांना साधत नाहीत, त्यांचा ज्यांना उबग येतो, त्यांच्या अंत:करणाला तुकोबांचे बोल जाऊन भिडतात, व त्यांचे दरिद्री संसारहि ते सुखी करतात. चित्तशुद्धीच्या साधनावर तुकोबांचा सर्वांत मोठा भर आहे. ईश्वर आपल्या हृदयांतच आहे पण काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर इत्यादि विकारांनी चित्त गढूळ आणि अस्वच्छ झाल्यामुळे, आराम देणारा हा हृदयस्थ राम आपणास दुरावला आहे. म्हणून हे विकार काढून टाकण्याचा सतत अभ्यास करून चित्त शुद्ध केलें पाहिजे. 'बैसोनि निवांत शुद्ध करी चित्त। तया सुखा अंत पार नाही। येऊनि अंतरीं राहील गोपाळ। सायासाचें फळ बैसलिया ॥' असा त्यांचा स्वानुभवच होता. म्हणून सर्वांच्या पायां पडून ते म्हणतात:— "आतां तरी पुढे हाचि उपदेश। नका करूं नाश आयुष्याचा। सकळांच्या पाया माझें दंडवत। आपुलालें चित्त शुद्ध करा" ॥ चित्त शुद्ध करून हृदयस्थ गोपाळाची भेट घेण्याची ज्यांची इच्छा व तयारी असेल त्यांनीच तुकोबांच्या वाटेला जावें. इतरांनी तिकडे न जावें हें बरें!

देव भेटण्याकरितां तीन निषेध आणि तीन विधि पाळले पाहिजेत (१) परनारी (२) परद्रव्य आणि (३) परनिंदा यांचा अभिलाप करतां कामा नये आणि (१) संतवचनावर विश्वास (२) रामनामाचा उच्चार आणि (३) सत्य आचार हीं तीन व्रतें पाळलीं पाहिजेत. "तुका म्हणे देव भेटे याचसाठी। आणिक ते आटी न लागे कांही" तुकोबांनी ही दीर्घ व कठीण तपश्चर्या स्वतः केली. हृदयस्थ सदय गोपाळाचें दर्शन घेतलें आणि आपलें सर्व जीवन त्याला अर्पण करून ते 'उपकारापुरते' उरले. तुकोबांच्या जीवनाचें हें सार-सर्वस्व आहे.

'ईश्वर: सर्वभूतानाम् हृद्देशेऽर्जुन तिष्ठति' असा अनुभव ज्यांना आला, त्यांचा सर्वभूतांकडे पहाण्याचा व त्यांच्याशी वागण्याचा दृष्टिकोन कसा असेल हें काय सांगावयास पाहिजे? जीवजातीला व्यापून रहाणाऱ्या या 'सर्वेश्वरा'च्या

पूजनाचें वर्म, ' कोणाहि जीवाचा न घडावा मत्सर ' हें आहे असें तुकाराम-बुवांनी स्पष्ट सांगितलें आहे...आणि ' दया, क्षमा, शांति । तेथे देवाची वसति ' असा सिद्धान्त प्रतिपादिला आहे. निर्मत्सरता, सदयता आणि क्षमा या गुणांनीच मानवी जीवन उन्नत होतें आणि मानवी समाज सुखाने व शांततेने जगूं शकतात. स्थलकालातीत आणि नित्य असा हा सिद्धान्त आहे हें विसरतां कामा नये. कांही निमित्ताने ' कंटकांचें निर्दलन ' अवश्य झालें तरी त्याची आवश्यकता ' भूतांच्या पालन।'तूनच निर्माण झाली पाहिजे. ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे ' तूं निर्मत्सर सदयता । वेथूनि निघशील कीर मागौता। परि ते गति समस्तां । न मनेल यया'॥ —निर्मत्सरता, सदयता व क्षमा हे गुण समजण्याइतकीहि ज्यांना पात्रता नसते, या गुणांना जे दुबळेपणा समजतात व 'चौदाव्या रत्ना'शिवाय इतर उपायांनी जें सुधारणें शक्य नसतें त्याचें 'निर्दालन' करण्याचा प्रसंग त्यांनी आणला तर, एरवीं ' मेणाहूनि मृदु असणारें ' हृदय 'वज्रापेक्षां कठिण' करून हें **नैमित्तिक** कर्तव्य पार पाडलेंच पाहिजे या विषयीं तुकोबांना मुळींच शंका नव्हती. दयेची व सज्जनांच्या संरक्षणाचीच ती दुसरी बाजू आहे अशी त्यांची निश्चिति होती. कारण या वैष्णव भक्तांचा देव 'घेऊनियां चक्र गदा हाच धंदा करीतो । भक्ता राखे पायापाशीं दुर्जनासी संहारी ॥ ' असा होता. पण हे निर्दलनाचे प्रसंग नैमित्तिक असून 'भूतांचें' पालन' या नित्य कर्तव्यांतून उत्पन्न झालेले असतात असा नित्य नैमित्ति-काचा विवेक कायम असला पाहिजे. म्हणून जे नैमित्तिकानेच नित्याची जागा घ्यावी असें म्हणतात किंवा जे नैमित्तिक मुळीच नको असें म्हणतात अशा दोन्ही प्रवृत्तींच्या लोकांना तुकारामबुवा उपकारक होण्यासारखे नाहीत. बुद्धिवादी पंडितांनी, ईश्वराच्या अस्तित्व-नास्तित्वाची, कर्माकर्माची, हिंसा-अहिंसेची तार्किक आणि सूक्ष्म चर्चा करून उलट-सुलट सिद्धान्त खुशाल करीत बसावें. या पंडित्याशी तुकाराबुवांना कांही कर्तव्य नाही.

सामान्य लोकांप्रमाणे तुकोबांचें जीवन भावनामय आहे. त्यांच्या शुद्ध भावनेने जे निर्णय दिले ते त्यांनी लोकांना भावपूर्णतेने सांगितले. सामान्य लोकांच्या जीवनाशी, सर्वेश्वरांचें पूजन करणारे तुकोबा समरस झाले. दीर्घ तपश्चर्येने ते जरी असामान्य झाले तरी ते सामान्यांमध्येच राहिले. त्यांना या तपश्चर्येनंतर जेव्हा ऋद्धिसिद्धि प्राप्त झाल्या व अलोट संपत्ति त्यांच्याकडे चालून आली तेव्हा त्यांची परीक्षा झाली. जन्माचे कष्ट व दारिद्र्य जाण्याचा हा प्रसंग साधण्याच्या मोहांत ते पडले नाहीत. यांतच त्यांचें असामान्यत्व आहे. ही श्रीमंती त्यांनी स्वीकारली नाही कारण त्यामुळे सामान्य लोकांपासून ते दूर गेले असते आणि सर्वेश्वराला आंचवले असते. यामुळेच असामान्य असलेला पण सामान्यांमध्येच राहाणारा हा महापुरुष महाराष्ट्रांतील कोट्यवधि भोळ्या-भावड्या जीवांचा विसावा आणि आसरा झाला आहे.

दुसऱ्यांचीं पुस्तकें

म. के. शेटे

☆

"Other Men's Flowers"— "दुसऱ्यांचीं फुलें" किती आकर्षक नांव ! लॉर्ड वॅव्हेलनी संपादन केलेला वरील काव्यसंग्रह माझ्या पाहण्यांत आला. रणवीराला काव्याची आवड असावी हा अपूर्व योग तर खराच. पण मला कौतुक वाटलें तें नांवाचें. असं सुंदर नांव शोधूनहि मिळणार नाहीं. दुसऱ्यांच्या फुलांना अगदी हळुवारपणाने व आपलेपणाने रसिकांपुढें मांडायचें हें काम कविहृदयच करूं जाणें. दुसऱ्यांच्या वस्तूंना आपल्या वस्तूंप्रमाणे जपायचें; त्यांची हेळसांड करायची नाहीं; ह्याला दिलदारपणाच हवा. पण ह्या बाबतींत अपवादच जास्त मिळतात. जी गोष्ट दुसऱ्यांच्या वस्तूंची तीच गोष्ट दुसऱ्यांच्या पुस्तकांची.

आपली पुस्तकें व दुसऱ्यांचीं पुस्तकें, ह्यांत फरक असतो कां ! सामान्यत: असतो असं म्हणायला हरकत नाहीं. निदान अनुभव तरी असाच आहे. आपल्या मालकीच्या पुस्तकांना सुबक वेष्टनें घालून कांचेच्या कपाटांत लोक ठेवतात. हेच महाभाग इतरांकडून आणलेलीं पुस्तकं मात्र खुशाल अव्यवस्थित फेकतात. त्यांची टापटीप, व्यवस्था, नेटकेपणा फक्त आपल्या पुस्तकांविषयीच पाहून घ्यावा. दुसऱ्यांचीं पुस्तकं खुशाल पोरावाळांच्या हातीं दिलेलीं असायचीं. मला एक अनुभव आठवतो. मी एकदा आमच्या एका मित्राच्या घरीं गेलों होतों. त्याचीं सर्व पुस्तकें कपाटांत कडेकोट बंदोबस्ताने ठेवलेलीं असत. आमच्या गप्पा चालू असतांना त्यांच्या चिरंजीवाकडे माझं सहज लक्ष गेलें. हा मुलगा एका पुस्तकावर रेघोट्या ओढण्यांत गर्क झाला होता. पुस्तकाचीं कांही पानें त्याने दाखविलेल्या सलगीशी सहमत न होऊन विस्कळीत झालीं होतीं. आपल्या पुत्ररत्नाच्या उद्योगीपणाबद्दल माझ्या मित्राने कौतुकाचे उद्गार काढले. मला तें पुस्तक ओळखीचें वाटून मी तें उचललें. तें माझ्याचकडून मित्राने आणलेलें पुस्तक होतें. पुढचा सुरम्य कथाभाग वर्णन करीत नाहीं. तो कल्पनेनेच जाणावा.

वाचनालयांच्या पुस्तकांविषयी जी अनास्था दिसते ती विचारूंच नका. कादंबरी किंवा लघुकथा असेल तर पानांपानांवर टीकाटिप्पणी लिहिलेली आढळते. नायक व नायिका ह्यांचे प्रेमप्रसंग असलेल्या पानांवर तेवढींच सरस भाष्यें ठळक पेन्सिलीने किंवा शाईने लिहिलेलीं असतात. मग कोणती कादंबरी अगोदर

वाचावी असा वाचकालाच भ्रम पडतो. इतर पुस्तकेंहि ह्या तडाख्यांतून सुटत नाहीत. 'हें पुस्तक × × × वाचनालय, ह्यांचे आहे' अशी फुकट घोषणा पुस्तकाच्या आरंभीं किंवा शेवटीं केलेली असते. 'तुम्ही हें पुस्तक जरूर वाचाच!' अशी प्रेमळ विनंतीहि लिहिलेली आढळते. पुस्तकांतील चित्रांचीं तोंडं रंगवणें ही तर नित्याचीच गोष्ट. स्वतःच्या पुस्तकांविषयी इतक्याच निष्काळजीपणाने हे लोक वागत असतील कां?

वाचनालयांच्या पुस्तकांचीं पानें फाडणें हा प्रकार सर्रास आढळतो. ह्या बाबतींत, लिहिलेलीं पानें व कोरीं पानें हा पंक्तिभेद वाचक करीत नाहीत. लिहिलेल्या पानांबरोबरच कोरीं पानेंहि त्यांच्या लालसेला बळी पडतात. एका अमेरिकन मासिकांत एक मजेदार गोष्ट आली होती. स्कॉच् लोक आपल्या कंजुषपणाबद्दल इंग्रजी वाङ्मयांत प्रसिद्ध आहेत. अशाच एका स्कॉच् मनुष्याबद्दल ही दंतकथा आहे. हा गृहस्थ पत्रें लिहितांनाहि आपली काटकसर सोडीत नसे. पोस्ट ऑफिसांत लोकांच्या सोयीसाठी ठेवलेल्या पेन्सिलीने तो आपलीं पत्रें लिहीत असे. कागदाचा प्रश्न तर त्याने मोठ्या कौशल्याने सोडवला होता. मोफत वाचनालयांत जाऊन तो पुस्तकांच्या आरंभीचीं व शेवटचीं कोरीं पानें फाडून आणीत असे व त्यांचा पत्रलेखनासाठी तो उपयोग करीत असे.

वाचक इतर दृष्टींनी सामान्य असतील पण, दुसऱ्यांचीं पुस्तकें खराब करण्यांत मात्र ते असामान्य कल्पक बनतात. दुसऱ्यांना दिलेलीं पुस्तकें परत आलीं म्हणजे मग त्यांच्या ह्या कल्पकतेचा चांगलाच अनुभव येतो. वाचतांना झोंप आली म्हणजे पुस्तकांचा उशी म्हणून उपयोग केला जातो. परिणाम? पुस्तकांच्या मुखपृष्ठावर तेलकट डाग पडणें! पुस्तकांच्या पानांवर कधीकधी चहाच्या कपाचे डाग लागलेले दिसतात. आपल्या चहापानाचा आस्वाद पुस्तकालाहि दिलेला पाहून त्यांच्या आतिथ्याचें सादर कौतुक वाटतें. अनेकदा पुस्तक दुमडून ठेवल्यामुळे त्याचीं पानें विस्कळित झालेलीं असतात किंवा मुखपृष्ठ व इतर पानें ह्यांची फारकत झालेली दिसते. पलंगाखाली ठेवण्यासाठी पुस्तकाचा उपयोग झाल्यामुळे मातीच्या तेलाचीहि पुस्तकाला चव चाखायला मिळते. स्त्रीवाचकहि या उदात्त परंपरेला हातभार लावतात. वाचतांना खूण म्हणून ठेवलेल्या आकड्यांमुळे, आकड्यांच्या आकृति अनेक पानांवर लागोपाठ उमटलेल्या आढळतात.

दुसऱ्यांच्या पुस्तकांना निष्काळजीपणाने वापरणाऱ्या लोकांचें वर्णन वर केलें. ह्यालाहि कांही ठळक अपवाद आढळतात. अशा अपवादांना वरील वर्णन लागूं पडत नाही. कारण, हे महाभाग एकदा नेलेलीं दुसऱ्यांचीं पुस्तकें पुन्हा परतच करीत नाहीत.

अनुक्रमणिका

डॉ. केतकरांच्या जीवनांतील कोमल छटा

दुर्गा भागवत

☆

डॉ. केतकरांचें व्यक्तित्व फार प्रभावी आहे. मीं त्यांना कधींच पाहिलें नव्हतें. १९३२ पासून त्यांचें वाङ्मय मीं वाचूं लागलें, त्यावेळीं मला जरी त्यांतलें बरेंचसें आकलन करतां येत नसे तरी, जें कांही समजे त्यावरून लिहिणाऱ्या माणसांत 'विशेष कांही तरी' आहे आणि तें विशेष म्हणजे हुकमी स्वरुपाचें आहे असा भास पानोपानीं होई. गेल्या दोन वर्षांच्या त्यांच्या अभ्यासानंतर तर त्यांच्या व्यक्तित्वाच्या किती तरी स्पष्ट व अस्पष्ट छटा उमजून आल्या. बहुतेक सर्व लेखन संशोधनपर असून देखील त्यांत आपल्या नुसत्या व्यक्तित्वाचाच नव्हे तर समग्र आयुःक्रमाचा ठसा इतका ठळक ठेवून गेलेला लेखक डॉ. केतकरांप्रमाणेच राजवाड्या-शिवाय महाराष्ट्रांत दुसरा आढळत नाही. डॉ. केतकरांचें त्यांच्या लेखनांतलें व्यक्तित्व भव्य तितकेंच उग्र आणि मिस्किल असें वाटतें. परंतु त्यांच्या जीवनांत पुष्कळशा कोमल छटाहि होत्या. त्या मला शीलवतीबाईंच्या संभाषणांतून कळून आल्या. डॉ. केतकरांच्या कुटुंबजीवनांतले हे कांही कण मी पुढे देत आहें.

१ सवत

डॉ. केतकरांचें लग्न त्यावेळीं नुकतेंच झालेलें होतें. हिंदुस्थानांत त्यावेळीं शीलवतीबाईंचा परिचय फारसा कुणाशी झालेला नव्हता. ज्ञानकोशमंडळां-तल्या लोकांशींच जें काय दळणवळण होतें तें. कुटुंबाविषयीं म्हणावें तर डॉ. केतकरांचे आई, बाप, भाऊ, बहीण सर्वचजणें अगोदर वारलेलीं. ज्या सख्या चुलत्यांच्या घरीं डॉ. केतकर आई वारल्यानंतर राहात, व ज्यांच्याबद्दल डॉक्टरांना कधींच प्रेम वाटलें नाही तेहि दिवंगत झाले होते. तेव्हा श्री. दिवाकरांसारखें एखाद दुसरे आप्त सोडल्यास कुटुंबाचा मागचा दुवा काहीच राहिलेला नव्हता. इंग्लंडांत झालेला परिचय नंतर पत्रोत्रीं वाढलेला स्नेह, नंतर प्रेम व लग्न अशा क्रमाने शीलवतीबाईंचा डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर या एका व्यक्तींतच समावलेल्या केतकर कुटुंबांत प्रवेश झाला. अगदी प्रारंभींच एक गंमतीचें वादळ या नव्या संसारांत एका कोंकणी फुंकरीने उठवलें. तें असें. डॉ. केतकर कांही महत्वाच्या कामासाठी बाहेर गांवीं गेले होते. शीलवतीबाई एकट्याच पुण्याच्या घरांत होत्या. एक दिवस तिन्हीसांजेच्या वेळीं एक पाहुणे आले. गुडघ्यापर्यंत मळकट धोतर, फाटका मळकटलेला कोट, कसा बसा डोक्याला गुंडाळलेला रुमाल, पायीं वाहणा असा त्यांचा थाट होता. अंगकाठी उंच आणि सडसडित. म्हातारपण

झाले होतें तरी नजर सूक्ष्म. हे गृहस्थ डॉक्टरांच्या नांवाचा पुकारा करीतच आले. शीलवतीबाईंनी दरवाजा उघडून त्यांचें स्वागत केलें आणि त्यांना आंत येऊन बसण्यास सांगितलें. 'डॉक्टर बाहेर गांवीं गेले आहेत, आज उद्यां येतील. आपलें काय काम आहे?" त्या म्हणाल्या.

गृहस्थांनीं उत्तर केलें "मी श्रीधरचा चुलता. कोंकणांत असतों. पण तुम्हांला मराठी येतं वाटतं? असो; तो नाही, पण त्याची बायको कुठं आहे?"

"मीच त्यांची बायको" शीलवतीबाई म्हणाल्या.

"अहो बायको म्हणजे पहिली बायको" काका म्हणाले.

"मीच त्यांची पहिली आणि एकटी बायको आहें. दुसरी बायको त्यांना नाही" शीलवतीबाई म्हणाल्या.

"वा! बरेंच सांगतां की. मी कां असा फसणार आहें त्याच्यानं? अहो, कसें सांगू तुम्हांला; त्यांचें लग्न मागेंच झालें आहे. पहिलीची गोष्टसुद्धा तुमच्या जवळ काढली नाही त्याने! काय म्हणावें! चुलताच ना मी त्याचा! मला सगळें माहीत आहे."

शीलवतीबाईंना काय बोलावें तें सुचेना. फिरून फिरून त्या म्हणत की "मीच त्यांची बायको, दुसरी नाही. तुम्ही हें काय सांगतां!" आणि म्हातारे म्हणत "हें तुमचें निवळ नाटक आहे." शेवटी डॉ. केतकरांच्या पहिल्या बायकोच्या हृदयद्रावक स्थितीचें रसभरीत वर्णन करून व तिच्या दैवगतीला बोल लावीत डॉ. केतकरांना दूषणें देत काका अंतर्धान पावले.

पण एवढ्या या संभाषणाने शीलवतीबाईंच्या मनावर आघात केला. ती सबंध रात्र त्यांनी रडून काढली. दुसऱ्या दिवशी डॉ. केतकर आले तेव्हा पत्नीचा एकंदर अवतार पाहून त्यांना हंसू आलें. "आज हें काय सोंग आणलें आहेस?" ते म्हणाले.

आतां शीलवतीबाईंना फारच राग आला. नक्कीच ते आपल्याला कामाचें निमित्त सांगून 'दुसरीकडे' गेले होते असें त्यांना वाटलें. "मला तुम्ही साफ बुडवलेंत. कशाला माझ्याशी लग्न केलेंत?"

"मी तुला बुडवलें? तें कसें काय बुवा? मी सगळें कांही तुला आधीच सांगितलें होतें. मी कांही बडा माणूस नाही हें तुला माहीत नव्हतें?" डॉक्टर विस्मय पावून म्हणाले.

"तें नव्हे. मी कुठे त्याबद्दल तक्रार करतें? तुमचें पहिलें लग्न झालेलें कां माझ्यापासून चोरून ठेवलें? तुमची पहिली बायको कुठे आहे?"

"कुणीं तुला हें सांगितलें? माझें लग्न एकदांच आणि तें तुझ्याशींच झालें आहे"

मग मन जरा शांत झाल्यावर डॉ. केतकरांना शीलवतीबाईंनी पाहुण्यांची हकीगत सांगितली. या चुलत्यांचा व डॉक्टरांचा कोणताच संबंध केव्हाच आला

नव्हता. त्यांना त्यांच्या उटाटेवीचें मात्र हसूं आलें. पण ही हंसण्याची गोष्ट नव्हती. शीलवतीबाईंना आतां आपण उगाच आकांत केला म्हणून हसूं आलें. पण डॉक्टर गंभीर झाले. आपलें एकपत्नीत्व सावीत करण्याचा त्यांनी आतां दृढ धरला. मग नागपूरवऱ्हाडांत जेवढे म्हणून आप्तस्नेही होते तेवढ्यांच्या घरीं त्यांनी शीलवतीबाईंस नेलें आणि सर्वांनी एकमतानें शीलवतीबाईंची सवत म्हणजे काकांच्या कोंकणी कल्पनेची एक भरारी होती असाच निकाल दिला.

२ अपत्यांचें भवितव्य

लग्नानंतर कांहीं दिवसांनी आपल्यास मूल झालें तर त्याचें एकंदर भवितव्य काय होईल याबद्दल डॉक्टर व शीलवतीबाई यांच्यांत चर्चा चालली होती. त्यांच्या चर्चेला नेहमीच शास्त्रीय स्वरूप येई. आतां ती चर्चा वंशशास्त्रावर येऊन टेपली. शीलवतीबाईंची आई व आत्या दोघी जणी एकाच प्रकारच्या दारुण आजाराला तरुणपणींच बळी पडल्या होत्या. त्यांच्या बाळपणाच्या आठवणी फार करुण व भीतिप्रद होत्या. तेव्हां या वायकांच्या विकृतीचा अंश आपल्या मुलांत तर येणार नाही ? असें शीलवतीबाईंना वाटलें. आणि मग या संकटांत मुलांस लोटणें उचित होईल कां ? असें त्यांनी डॉक्टरांस विचारलें. डॉक्टरांची दृष्टि त्याहिपेक्षा पल्लेदार. कोहेन कुटुंबांतल्या सगळ्या आधिव्याधि केतकरांच्या कुटुंबांतल्या आधिव्याधींच्या आसपासहि येऊं शकणार नाहीत असें ते म्हणाले. आपले दोन्ही बाजूचे आजे पणजे, लांबचे जवळचे चुलते, आत्या, मावश्या मामे यांच्या समग्र रोगांची एक भयानक जंत्री त्यांनी शीलवतीबाईसमोर मांडली आणि मग ते म्हणाले. "प्रत्येक जोडप्याला याच संकटांतून जायचें आहे. कुणास माहीत कोणत्या पूर्वजाचे काय गुण, अवगुण विकृति, अपत्याचें भवितव्य घडवीत असते. आपण निरोगी आहोंत, सुबुद्ध आहोंत, मुलांच्या पालनाविषयी तत्पर आहोंत. याहून मुलें हवीं असण्यास दुसऱ्या कोणत्या गोष्टीची जरूर आहे ?" स्वतःला मूल नच झाल्यास, कोणाचेंहि मूल आपलें म्हणून बाळगावें, मुलाशिवाय संसार व्यर्थ आहे, या बाबतींत त्यांचें दोघांचेंहि एकमत होतें.

३ "तूं गेलीस तर"

लग्नानंतर एकदोन वर्षांच्या आंत शीलवतीबाई अत्यवस्थ आजारी झाल्या. आपण बऱ्या होऊं कीं नाही, याबद्दल त्यांना शंका वाटूं लागली पण मृत्यूच्या भीतिपेक्षाहि एका दारुण शंकेने त्यांना हैराण केलें होतें. आपण मेल्यावर डॉक्टर फिरून लग्न करतील काय ! हा विचार कांहीं केल्या त्यांच्या डोक्यांतून जाईना. गेल्यानंतर येणाऱ्या सवतीची कल्पनाच त्यांना सहन होईना. त्यांनी डॉक्टरांना विचारलें. डॉक्टरांचे डोळे भरून आले. ' तूं गेलीस तर खचित सांगतों की दुसरें लग्न करणार नाही. कारण तूं गेलीस की माझें जीवनच संपलें असें होईल. त्यांत कांहीं अर्थ उरणार नाही. पण कांहीं झाले, किती दुःखें झालीं, तरी आयुष्याचा नैसर्गिक शेवट येईपर्यंत माणसाने त्याचा त्याग करूं नये. धीर

घरलांच पाहिजे, आणि मला माझें काम आहे कीं, तें केलेंच पाहिजे, पुष्कळ जगून केलें पाहिजे. पण शरीर व बुद्धि तें काम करीत राहील एवढेंच. माझें अंत:करण तुझ्याबरोबरच गेलेलें असेल." शीलवतीबाई म्हणतात "त्यांचें हें बोलणें ध्यानांत ठेवूनच मी आतां त्यांचें काम करीतच दिवस काढते आहे".

४ मुलें

मुलें डॉक्टरांना फार आवडत. ते वारले तेव्हा वीरा दहा अकरा वर्षांचीच असेल. पण लहानपणापासून त्या मुलींत विशेष प्रकारची प्रतिभा आहे असें ते शीलवतीबाईंना सांगत. ते नेहमी म्हणायचे, 'ही मुलगी म्हणजे आपल्या कर्तृत्वाचा उत्कृष्ट नमुना, (She will be our masterpiece) होईल.

मुलांच्या भवितव्याविषयी बोलणें निघालें, की त्यांनी म्हणावें 'हें पहा, मुलें मोठीं झालीं, दूर गेलीं, कशीहि वागलीं, तरी माझ्यामागे तूं आपल्या घराचा दरवाजा त्यांच्यासाठी नेहमी खुला ठेव. आपल्या आसऱ्यापासून दूर जावेसें वाटेल तेव्हा दुर्दैवच त्यांचा पाठलाग करीत आहे असें समज; आणि त्यावेळी थकल्यावर परत यावेसें वाटलें, तर तुझ्या घराचा मायेचा एकच एक आसरा बंद झाला तर त्यांनी कुठें जावें?"

५ देवा बापा, त्यांना क्षमा कर

डॉ. केतकरांच्या सर्वच लेखनावर प्रखर टीका व्हायच्या हें ठरलेलेंच असे. डॉक्टर नेहमी आपल्या कल्पना शीलवतीबाईंना सांगून त्यांच्याशी चर्चा करीत. या गप्पांत ते रंगून जात. आयुष्याच्या शेवटीं शेवटीं तर त्यांनी क्लबांत वगैरे जाणेंहि सोडलें होतें. ते घरच्या या विश्रांतीच्या घटकांना 'होम क्लब' म्हणत. अशा या बौद्धिक साहचर्यातहि डॉक्टरांच्या नित्य नव्या उफाळून येणाऱ्या कल्पनांचें वैभव पाहून शीलवतीबाईंना नेहमी आश्चर्य वाटे आणि त्या कल्पनांची लोकांनी टवाळी केलेली पाहून त्यांना प्रथम फार राग येई. तेव्हा डॉक्टर केतकर नेहमी हंसून खिस्ताचें वाक्य उच्चारायचे 'देवा बापा, त्यांना क्षमा कर. ते काय करतात तें त्यांना उमगत नाही (Father forgive them. They do not know what they do.) पुढच्या पिढीसाठी माझें हें लिहिणें आहे. ती त्याचें चीज करील'

६ पानें फाडलीं

डॉ. केतकरांनी हीन टीकाकारांची दया केली तरी ते स्वत:च्या लेखनाकडे किती कठोरपणाने पहात याबद्दल शीलवतीबाई म्हणाल्या:-
"प्राचीन महाराष्ट्राचा पांचशें पानांचा एक भाग लिहून तयार झाला. छापला. व्हायचा तो खर्च झाला. पण मागाहून त्यांच्या वाचनांत जे ग्रंथ आले त्यावरून यांना आपलीं विधानें चुकलीं आहेत हें कळलें. त्यांनीं तो खर्च म्हणजेच नुकसान सोसलें आणि सर्व पानें फाडून टाकलीं आणि परत लिहायला सुरुवात केली. आपण ज्ञानोपासना करतों त्यांत किल्मिष राहूं नये म्हणून त्यांचा कटाक्ष असे. पैशाची ओढताण असूनहि पैसा असा त्यांनी तुच्छ लेखला. त्याचप्रमाणे घरादाराची ते म्हणायचे की मी शेवटीं घरादाराचा त्याग करून संन्यास घेणार आहे. पण हा संन्यास मोक्षासाठीं, भक्तीसाठी नव्हता तर निर्भेळ ज्ञानाच्या प्रसारासाठी, समाजकार्यासाठी घ्यायचा होता.

वाणी विलास

वि ला सी

★

सुमारे दोन महिन्यांपूर्वी प्रा. ना. सी. फडके अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयांत येऊन गेले. नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजांतील महाराष्ट्र भाषा संवर्धक मंडळाच्या रौप्यमहोत्सवासाठी त्यांना बोलाविण्याचें मंडळाच्या कार्यकर्त्यांनी ठरविलें होतें असें ऐकिवांत आहे. परंतु प्रा. फडक्यांनी पहिल्या वर्गाचा प्रवास खर्च मागितल्याने मंडळाला आपली इच्छा आवरावी लागली अशी बोलवा आहे. हिस्लॉप कॉलेज सारख्या संस्थेंत मराठी भाषेच्या संवर्धनासाठी अव्याहत कार्य करीत असलेलें हें मंडळ आर्थिक दृष्टीने संपन्न नसेल आणि प्रा. फडक्यांचा कोल्हापूर ते नागपूर पर्यंतचा येण्याजाण्याचा खर्च देण्याची मंडळाची ऐपत नसेल हें खरें आहे. येथे मुद्दा महाराष्ट्र भाषा संवर्धक मंडळाचा किंवा प्रा. फडक्यांचा नाही. पण ही जी बोलवा कानीं आली त्यावरून मागे एक दोनदा पुण्या-मुंबईकडील मासिकांतून चर्चिला गेलेला मुद्दा आठवला. साहित्यिक म्हणा किंवा विद्वान् म्हणा यांना जेव्हा कोठल्याहि समारंभासाठी पाचारण केलें जातें तेव्हा त्यांच्या खर्चाचा मुद्दा अगदीच गौण मानण्यांत येतो. त्याने खर्च घेतला नाही तर त्याचें विशेषच कौतुक केलें जातें. ह्या कौतुक करणाऱ्या मंडळींची विचारसरणी अजून विलासीच्या परिचयाची झाली नाही. मागे मला वाटतें प्रा. काणेकरांनी कुठेंसें असें प्रतिपादन केलें होतें की व्याख्यानाला बोलाविणाऱ्या विद्वानाला त्याचा मेहनताना दिला जावा. त्या त्यांच्या मताबद्दल विरोध दर्शवितांना विद्वानांच्या ज्ञानाची किंमत पैशाने करणें योग्य नाहीं असें कांहींनी म्हटलें होतें. विद्वानांच्या ज्ञानाची किंमत कशाने करावयाची हा प्रश्न सध्या बाजूला ठेवूं, पण ज्याने प्रसंगाला शोभा आणली, ज्याचें व्याख्यान ऐकण्यासाठी संस्थेतर्फे चार मंडळी बोलाविलीं जातात, ज्याला सन्मान्य व मुख्य पाहुणा म्हणून आपण वागविलें त्याच्या प्रवासाच्या थोड्याशा सुखसोयी आपण लक्षांत घेतल्या तर फार नुकसान होईल असें नाही. हें अवश्य तर आहेच पण पाहुण्यांच्या मानसिक समाधानाचाहि प्रश्न आहे. व्याख्याता कार्यक्रमाला येतो तो आपले एकदोन दिवसाचे तरी नित्यक्रम बाजूला ठेवून व झीज सोसून येतो.

अनुक्रमणिका

त्याचा प्रसंगाच्या शोभेपुरता मान ठेवला जातो. पण आपली गरज संपल्यावरोबर कधीकधी त्याच्याशी व्हावें तितकें योग्य वर्तन होत नाही. आजच्या जगांत माणुस जें काय करतो तें प्रेमाच्या, प्रतिष्ठेच्या किंवा द्रव्याच्या आशेने. एखाद्याने द्रव्याची अपेक्षा बाळगली तर आजच्या जगांत त्याला फारसा दोष द्यायला जागा नाही. कित्येक समारंभांत व्याख्यान हा मुख्य कार्यक्रम आणि इतर करमणूक गायनादि उपकार्यक्रम असतात, आणि मौज अशी की या उपकार्यक्रमाच्या सफलतेसाठी उमाप पैसा खर्च केला जातो. एखादें गाणें असलें तर तबलजी, पेटीवाला आणि इतर साथ देणारे आपल्या श्रमाचा मोबदला घेतात आणि गाणारादि आपल्या नांवलौकिकाप्रमाणे योग्य ते पैसे घेतो''''नि आपण देतों. त्यांत कुणाला कांहीच गैर वाटत नाही. मग व्याख्यात्याने आपल्या भाषणाबद्दल कांही अपेक्षा केली तर त्यांत गैर काय आहे ? आणि ही भावना मनांत बाळगून जर व्याख्याता मागत नसेल तर त्याचा प्रवास खर्च तरी कमींत कमी सढळ हाताने कां दिला जाऊं नये ? पुष्कळ विद्वान व्याख्याते आपल्या सार्वजनिक जीवनाच्या गमती सांगत असतात. कित्येकांची नुसत्या हारतुऱ्यांनी बोळवण होते. कित्येकांना अगदी रेल्वेच्या तिकिटावर पाहून पैसे दिले जातात. आणि कित्येकांना तर तेंहि लाभत नाही. परवां नागपूरला गडकरी स्मृतिदिन गडकरी स्मारक मंडळाने साजरा केला. त्यांत आमंत्रित केलेल्या एका व्याख्यात्यांनी फारच स्पष्ट रीतीने आपल्या मनांतील खळबळ बोलून दाखविली. ते म्हणाले—"अहो मी बोललों हेंच पुष्कळ समजा. एरवीं माझ्या स्वभावाप्रमाणे मीं तिथल्या तिथेच मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या निष्काळजीपणाचा उल्लेख करावयास हवा. मला व्याख्यानाची विनंती चिठ्ठीने करण्यांत आली. माझा अपराध मी घरीं नव्हतों असा सांगण्यांत आला. व्याख्यान कुठे आहे, कितीं वाजतां आहे यांचीहि मला जाणीव दिली गेली नाही. याबद्दल खुलासा 'वर्तमानपत्रांत आम्ही बातमी दिली होती, 'असा करण्यांत आला. मीं माझी जबाबदारी सांभाळावी म्हणून स्वतःची पदरमोड करून तिथे गेलों आणि पुनः परत येतांना पदरमोडीने घरी आलों. जणुं माझा घसा खवखवत होता आणि डॉक्टरांच्या सल्याप्रमाणे मला बोलणें भाग होतें." हें त्यांचें म्हणणें मी त्यांना विचारूनच इथे देत आहें याबद्दल कुणाला काही वाटावयांचें असेल तर तें जरूर वाटावें असा त्यांचा मनोदय आहे.

असें कां होतें ? याची कारणमीमांसा करण्यापेक्षा विद्वानांची व ज्यांना आपण सन्मानाने बोलावून औपचारिक कां होईना पण ज्यांचे आपण आभार मानतों त्यांची कदर होणें अवश्य आहे. नाहीतर बेजबाबदारी शिवाय हातीं कांही लागणारच नाही आणि श्रोते व वक्ता यांच्यामध्ये श्रद्धा सद्भाव इत्यादिंचा अभाव वाढत जाईल. म्हणूनच प्रस्तुत मुद्दा येथे विस्ताराने मांडला आहे व याबद्दल "विलासी"शी कुणाचा मतभेद होईल असें त्याला वाटत नाही. * * *

'वाणीचीं खास सदरें २

मध्यप्रदेश संशोधन वार्ता

म. म. प्राचार्य वा. वि. मिराशी ह्यांनी वर्धेपासून चार मैलांवर असलेलें व आचार्य विनोबाजींच्या 'परंधाम' निवासाने विशेष महत्त्व पावलेलें जें पवनार नांवाचें धाम नदीच्या तीरीं गांव आहे तेथील जुन्या अवशेषांचें संशोधन करून 'सेवक' मध्ये 'पवनार येथील प्राचीन अवशेष' या शिर्षकाखालीं एक अभ्यास-पूर्ण लेख लिहिला आहे. त्यांतील महत्त्वाचा भाग खालीं दिला आहे.

वर्ध्याजवळ धाम नदीच्या उजव्या तीरावर वसलेलें पवनार हें वाकाटकांची राजधानी असलेलें प्रवरपूर असावें असा समज प्रचलित आहे. येथे सापडलेलीं शिल्पें गुप्त वाकाटक कालीन असल्याचा निर्णय प्राच्य विद्या परिषदेने केल्यापासून यास विशेषच पुष्टि मिळाली आहे.

सापडलेल्या मूर्तींपैकी एक वर्धेच्या प्रसिद्ध मगन संग्रहांत ठेवली आहे. ही मूर्ति विष्णूची असून काळ्या पाषाणाची बनविली आहे. मस्तक, वरील किरीट, गळ्यांतले हार, श्रीवत्स, अधिवस्त्र हीं उत्कृष्ट रीतीने कोरलीं आहेत. ही मूर्ति मध्ययुगीन काळांतील इ. स. च्या १०–११ शतकांतील असावी.

धाम नदीच्या डाव्या तीरावरील देवालयांत शेषशायी भगवानाची भव्य मूर्ति आहे. या मूर्तीचें काम सामान्य प्रतीचें असून ती भारतीय शिल्पकलेच्या निकृष्टावस्थेच्या काळांत केलेली दिसते.

विनोबांच्या आश्रमाजवळ सापडलेल्या बहुतेक मूर्ति भग्नावस्थेंत आहेत. त्यांतील दोन शिल्पें मात्र अद्यापि शाबुत आहेत. पैकी एका शिल्पांत चार मूर्ति स्पष्ट दिसतात. त्या सीता, राम, भरत, लक्ष्मण यांच्या होत. विनोबांना या शिल्पाला भरतभेट असें सार्थ नांव दिलें आहे. शिल्पाचें काम अजंठ्याच्या लेण्यांतील चित्रांसारखें आहे.

दुसऱ्या शिल्पाच्या विषयाबद्दल मतभेद प्रचलित आहेत. कोणी त्यास 'अहिल्योद्धार' म्हणतात तर कोणी 'अहीरावण वध' म्हणतात. बारकाईने निरिक्षण केल्यानंतर सदहू मूर्ति वाली-वधाची असावी असें वाटतें. रामायणांतील वाली-वधाचा प्रसंग प्रस्तुत शिल्पांत उत्कृष्ट रीतीने दाखविला आहे. साधेपणा, स्वाभाविकता, संयम, धार्मिकता हे गुप्तकालीन शिल्पाचे विशेष या दोन्ही शिल्पांत दिसतात.

वाकाटकांची राजधानी नंदीवर्धनास (रामटेकच्या जवळील नगरधनास) होती. पुढे प्रवरसेनाने आपली राजधानी आपल्या नांवाने शहर वसवून तेथे नेली असावी. राजधानीजवळ राममंदिराची आवश्यकता वाटल्यावरून त्याने श्रीरामचंद्राचें उत्तुंग देवालय बांधलें असावें.

विनोबांच्या आश्रमालगतचें स्थान दीड हजार वर्षांपूर्वी वाकाटकाने राम-मंदिराकरता पसंत केलें असावें व तदनुषंगाने प्रवरपूर राजधानी त्याच्या जवळपास असावी असें अनुमान सूक्ष्म निरीक्षणानंतर निघतें.

'वाणीची खास सदरें ३

मध्यप्रदेश साहित्य वार्ता

(१) सिताबर्डी नागपूर येथील 'वीणा प्रकाशन' ही संस्था श्री. ब. गो. गर्गे, एम्. ए. हे चालवीत असतात. त्यांचीं खालील पुस्तकें येवढ्यांत प्रकाशित झालीं आहेत.

(१) नवी मळवाट; कवि—शरद्चंद्र मुक्तिबोध
मुद्रण स्थळ—सुरुचि प्रिंटिंग प्रेस, माऊंट रोड, नागपूर. किंमत २॥ रु.

(२) सुखशांतीचें बेट—(बालवाङ्मय.)
लेखक—य. वि. ठोसर एम्. एस्सी.
मुद्रण स्थळ—नारायण मुद्रणालय, धंतोली नागपूर, किंमत आठ आणे.

(३) जादूचे रुपये—(बालवाङ्मय.)
लेखक—पांडुरंग वेलणकर, शिक्षक आर. एम्. भट हायस्कूल, परळ मुंबई.
मुद्रण स्थळ—नारायण मुद्रणालय, धंतोली नागपूर किंमत ८ आणे.

(४) बागलाणांतील कारस्थान (बालवाङ्मय)
लेखक—देवदत्त नारायण टिळक,
मुद्रण स्थळ—आर्य यंत्रालय, हंसापुरी, नागपूर. किंमत ८ आणे.

(५) आधुनिक नागरिकशास्त्र
लेखक—प्रा. गो. मा. कुळकर्णी,
मुद्रण स्थळ—इंडियाना प्रेस, नागपूर. किंमत ३॥ रु.

(६) मधु–बोल
लेखिका—कु. लीला दीक्षित.
मुद्रण स्थळ—सुरुचि प्रेस, माऊंट रोड, नागपूर. किंमत ३ रु.

(२) सीताबर्डी, नागपूर येथील नागपूर प्रकाशन ही संस्था श्री. दि. मा. धुमाळ हे चालवीत असतात. त्यांनी तेवढ्यांत खालील पुस्तकें प्रकाशित केलीं आहेत :—

काल समुद्रांतील रत्नें —

लेखक—बॅ. गो. वि. देशमुख,
प्रस्तावना लेखक—लोकनायक मा. श्री. अणे, बिहारचे गव्हर्नर
मुद्रण स्थळ—रामेश्वर प्रिंटिंग प्रेस, सीताबर्डी, नागपूर.
किंमत ४ रु.

(३) सीताबर्डी, नागपूर येथील दिलीप प्रकाशन संस्थेतर्फे खालील पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघालेली आहे.

यशाचें रहस्य
मुद्रण स्थळ—सदाशिव प्रिंटिंग प्रेस, वर्धा. किंमत ८ आणे.

---

(४) 'युगवाणी'कडे खालील पुस्तकें अभिप्रायार्थ आलीं आहेत.

(१) बातमीदार (सामाजिक नाटक)
लेखक—प्र. श्री. कोल्हटकर,
प्रकाशक—मॉडर्न बुक डेपो, पुणें नं. २, किंमत १॥ रु.

(२) कुमारांचा सोबती (शिक्षणविषयक ग्रंथ)
लेखक—य. गो. नित्सुरे,
प्रकाशक—य. गो. नित्सुरे, नित्सुरे सदन, कचरेवाडी, प्रभात-पथ, पुणें ४. किंमत २॥ रु.

(३) महानुभावांचा आचारधर्म
लेखक—डॉ. वि. भि. कोलते
प्रकाशक—अरुण प्रकाशन, मलकापूर किं. ६ रु.

(४) डोहाळे व उपदेश
लेखक—डॉ. कृ. श्री. म्हसकर,
प्रकाशक—जय हिंद प्रकाशन, मुंबई २, किं. ६ आणे.

(५) लोकशाहीच्या आघाडीवर
लेखक—डॉ. रामभाऊ भोगे
प्रकाशक—जय हिंद प्रकाशन, मुंबई २.किंमत ४ आणे

विदर्भ साहित्य संघवार्ता—

रविवार दिनांक ५ मार्च १९५० रोजीं नागपूर मुक्कामीं दुपारीं ४ वाजतां वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा होऊन तींत खालील महत्त्वाचे निर्णय करण्यांत आले –

(१) वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनीं ता. २०-२-५० रोजीं वि. सा. मंदिराच्या जागेसाठीं नागपूरच्या डेप्युटी कमिश्नरकडे अर्ज केला. या अर्जाला ता. १ मार्च १९५० रोजीं डेप्युटी कमिश्नरांनी मंजुरी दिली. या संबंधीच्या कामाचें निवेदन मंदिर समितीचे आमंत्रक श्री. ए. श्री. पटवर्धन यांनीं वाचून दाखविलें.

"विदर्भ साहित्य मंदिर योजनेला मूर्तरूप आणून देण्यासाठीं व वि. सा. संघाच्या इतर अडचणी दूर करून घेण्यासाठीं मध्यप्रदेश सरकारकडे खालील गृहस्थांचें शिष्टमंडळ पाठविण्यांत यावें" —

(१) न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति —प्रमुख
(२) श्री. ग. त्र्यं. माडखोलकर
(३) श्री. पु. य. देशपांडे
(४) प्रा. श्री. ना. बनहट्टी
(५) श्री. बाळासाहेब ढवळे
(६) प्रा. डॉ. वि. भि. कोलते
(७) डॉ. य. खु. देशपांडे
(८) प्रा. डॉ. मा. गो. देशमुख
(९) श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी

"या शिष्टमंडळाचें म्हणणें सरकारपुढे रीतसर मांडण्यासाठीं एक लेखी निवेदन संघाध्यक्षांनी आधी तयार करावें. निवेदनांत खालील गोष्टींचा अंतर्भाव प्रामुख्याने व्हावा—

(१) इमारतीची जागा व इतर सवलती
(२) वार्षिक देणगी
(३) वि. सा. संघातर्फे होणाऱ्या परीक्षांना मान्यता
(४) वि. सा. संघासाठीं करण्यांत येणाऱ्या नाटकांवरील करमा फी.

(२) "वि. सा. मंदिराच्या कायम व्यवस्थेसाठीं विश्वस्त नेमणें आवश्यक आहे. म्हणून विश्वस्तपत्राचा मसुदा तयार करणें व विश्वस्तांचीं नांवें सुचविणें या कामासाठीं पुढील समिति नेमण्यांत येत आहे :—

(१) न्या. मू. के. तु. मंगळमूर्ती, नागपूर
(२) डॉ. य. खु. देशपांडे, यवतमाळ.
(३) श्री. पु. य. देशपांडे, नागपूर (आमंत्रक)

(३) गडकरी स्मारक समितीच्या चिटणीसांनी अध्यक्ष, वि. सा. संघ यांना पाठविलेल्या ता. २३-२-५० च्या पत्रांत आपल्या जवळ असलेल्या सर्व निधीसह गडकरी स्मारक समितीची वि. सा. संघांत विलीन होण्याची इच्छा रीतसर ठरावाने व्यक्त करून गडकऱ्यांचें स्मारक इतर रीतींनींहि करण्याची विनंती वि. सा. संघाला केली आहे.

" गडकरी स्मारक समितीची ती विनंती मान्य करण्यांत आली. "

(४) " सभासद नोंदणीच्या कामासाठी वि. सा संघाचे अध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि प्रा. वा. कृ. चोरघडे यांची समिति नेमण्यांत आली. "

(५) " सौ. उषाबाई कोलते यांची परीक्षा समितीचे सभासद म्हणून नेमणूक "

" सौ. इंदुमती शेवडे, सौ. सुशीलाबाई कोठीवान आणि श्री. य. वा. शास्त्री यांची वि. सा. संघाच्या ' निधि समिती ' वर नियुक्ति.

(६) " यापुढे युगवाणीचे अंक ज्यांच्या कडून चालू वर्षाची सभासदत्वाची वर्गणी आली नसेल त्यांना पाठविण्यांत येऊं नये. "

कळावें,	आपला नम्र
प्रभानिवास, जेल रोड	ग. पु. सगदेव
नागपूर नं. १. दिनांक १७-२-५०	चिटणिस, वि. सा. सं.

[युगवाणी माहे मार्च १९५० च्या अंकांत शेवटीं ' विदर्भ साहित्य संघ ' या मथळयाखाली जीं दहापानें छापलीं त्यांतील पान ६ वर शनिवार दिनांक ४-२-१९५० रोजीं दुपारी ४ वाजतां साधारण सभा भरून तींत जे ठराव मंजूर झाले त्यांपैकी खालील दोन ठराव नजर चुकीने गेल्या अंकांत छापण्याचे राहून गेले. ते या अंकांत सभासदांच्या माहितीसाठी देत आहें. महत्वाचे ठराव छापण्याचे राहून गेल्याबद्दल क्षमस्व ! --संपादक, युगवाणी]

विदर्भ साहित्य संघ—साधारण सभा

शनिवार दिनांक ४-२-१९५० दुपारीं ४ वाजतां

(५) " प्रांतांतील राजकीय, संस्कृतिक आणि भाषिक परिस्थिति लक्षांत घेता नागपूर सारख्या राजधानीच्या ठिकाणीं विदर्भ साहित्य मंदिर स्थापन होणें अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी नागपुरांत जागा घेणें, इमारत बांधणें व वि. सा. मंदिराचे सर्व उद्देश साध्य करण्यासाठी इतर आवश्यक ती कायम स्वरूपाची व्यवस्था करणें या बाबताचे सर्व अधिकार ही सभा कार्यकारी मंडळाला देत आहे. "

(ठराव सर्वानुमते मंजूर)

(६) ता. ४-२-१९५० रोजीं चादा मुक्कामी भरलेल्या नवीन कार्यकारी मंडळाच्या सभेचा ठराव नं. २ साधारण सभेपुढे रीतसर मांडला गेला असता त्याला हरकत घेण्यांत आली व त्यावर अध्यक्षांनीं हा ठराव १९५० च्या कार्यकारी मंडळाचा असल्यामुळे या साधारण सभेपुढे तो येऊं शकत नाही असा निर्णय देऊन तो नियमबाह्य ठरविला.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे सभासद व्हा !

विदर्भ साहित्य संघाचा या वर्षी एक हजार सभासद बनविण्याचा संकल्प आहे. फेब्रुवारी अखेर सभासदांची संख्या ३०१ होती ती आजतागायात ४०५ आहे. नवीन तहाह्यात सभासदांत श्री. ए. श्री. पटवर्धन व श्री. द. स. पराडकर यांची भर पडली आहे. सभासद वाढविण्याच्या कामीं मागील अंकांत उल्लेखिलेल्या व्यक्ति व श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी व उदयोन्मुख कवि श्री. यशवंत धर्माधिकारी यांची मदत होत आहे. त्याबद्दल येथे साभार उल्लेख. कार्यकारी मंडळाच्या सर्वच सभासदांनी अजून आपली सभासद वाढविण्याची मोहीम सुरू केलेली दिसत नाही. कारण तसें पाहिलें तर प्रत्येक सदस्याच्या वाट्याला केवळ ७५ सभासद येतात. त्यांनी याबाबत आपले जबाबदारीने मराठी प्रेमी जनतेला जागें करावें अशी विनंति आहे.

वि. भि. कोलते,
वामन कृष्ण चोरघडे,
शं. ना. सहस्त्रबुद्धे,
रा. पु. सगदेव.

१९५० चें कार्यकारी मंडळ

अध्यक्ष
गजानन त्र्यंबक माडखोलकर

सदस्य
न्या. मू. के. टी. मंगळमूर्ति,
डॉ. यशवंत खुशाल देशपांडे,
प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी,
श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे,
डॉ. माधव गोपाळ देशमुख,
प्रि. हरि नारायण नेने,
डॉ. विष्णु भिकाजी कोलते,
प्रा. वामन कृष्ण चोरघडे,
श्री. द. रा. गोमकाळे,
श्री. रा. पु. सगदेव,
श्री. प्र. ना. खोडे,
प्रा. भवानीशंकर पंडित,
श्री. शकुंतलाबाई दिवाणजी,
श्री. शंकर नारायण सहस्त्रबुद्धे.
श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे,
श्री. एकनाथ श्री. पटवर्धन.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या दृष्टीने शक्ति वाढवा !

पत्रव्यवहाराचा पत्ता :
युगवाणी कार्यालय, वझलवार कॉलनी, धरमपेठ, नागपूर.

मुद्रक, प्रकाशक : प. वि. वेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका